## थांबलेल्या टिप्परला धडक; चालक ठार

✔ **बार्शी** : रस्त्यावर थांबलेल्या टिप्परला पाठीमागून दुचाकी धडकल्याने चालक ठार तर दुसरा जखमी झाला. हा अपघात शेलगाव (ता.बार्शी) येथील धाराशिव रस्त्यावर शनिवारी घडला. बार्शी त पोलिसांनी टिप्परच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नितीन नामदेव शेळके (वय ३४ रा.वांगी ता.भूम) असे मयताचे नाव आहे. तो दुचाकीवरून गावातील राहुल माळी याच्यासोबत शेलगाव कडून बार्शीकडे निघाला होता. सायंकाळी रस्त्यावर थांबलेल्या एमएच २५-एफ-००५६ या टिप्परला पाठीमागून धडकल्याने दोघेही जखमी झाले होते. शेळके हा उपचारापूर्वी मयत झाला. तपास फौजदार शिरसट करीत आहेत.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । सोमवार, दि. २३ सप्टेंबर २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३५४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



# राजनमालकच किंग...

## दादांनी उताविळांना झापलं, अनगरकरांना 'बूस्ट' दिलं

✔ मोहोळ/प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची रविवारी मोहोळमध्ये झालेली सभा चांगलीच गाजली. मोहोळच्या राजकारणात अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात धुसपूस सुरू आहे. मोहोळ तहसीलचे अपर तहसील कार्यालय अनगरला केल्यापासून तर माजी आमदार राजन (मालक) पाटील आणि अजितदादा यांचेच विश्वासू मानले जाणारे उमेश पाटील यांच्यात संघर्ष सुरू आहे.त्याकडे लक्ष वेधत अजितदादांनी पक्षातील बेशिस्तपणे वागणाऱ्या उताविळ नेत्यांना खडे बोल सुनावताना मालक तुम्ही बिनधास्तपणे कामाला लागा,अशा शब्दात त्यांनी राजन पाटील यांना ताकत दिली. त्यामुळे अजितदादांच्या पक्षाचे किंग मालकच असतील हे स्पष्ट झाले. जाती-पातीचा,नात्या गोत्याचा विचार न करता सोलापूर जिल्ह्यात महायुतीचेच आमदार निवडून आले पाहिजेत, असा स्पष्ट आदेश नेते,पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना त्यांनी दिला.दरम्यान राजन पाटील यांच्या घराण्याला आम्ही न्याय दिला नाही,अशी स्पष्ट कबुली या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिल्यामुळे येत्या काळात मालकांना कोणती लॉटरी लागणार याविषयी मोहोळ तालुक्यात उत्सुकता निर्माण झाली आहे.**

अजितदादांनी राज्यभर जनसन्मान यात्रा आयोजित केली आहे. ही यात्रा रविवारी मोहोळला आली होती.मार्केट कमिटीच्या मैदानावर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. मोहोळच्या राजकारणात माजी आमदार राजन पाटील आणि राष्ट्रवादीचे नेते उमेश पाटील हे एकमेकांचे विरोधक मानले जातात. राष्ट्रवादीमध्ये दोन गट पडल्यानंतर दोन्ही नेते अजित पवारांच्यासोबत आहेत. एकच पक्षात असले तरी स्थानिक पातळीवर दोघांमध्ये वितुष्ट कायम आहे. त्यातच मोहोळम धील बंदला पाठिंबा देताना, दादा आपसे बैर नही, राजन तेरी खैर नही, असा नारा उमेश पाटलांनी दिला होता. अपर तहसील कार्यालय अनगरला न्यायला उमेश पाटील यांनी विरोध केला आहे. ही सारी पार्श्वभूमी पाहाता अजितदादा काय बोलणार याकडे मोहोळसह साऱ्या जिल्ह्याचे लक्ष लागून होते.

मोहोळच्या विकासावर तसेच मोहोळच्या जनतेने त्यांना दिलेली साथ यावर प्रकार टाकताना अजित पवार यांनी पक्षातील उताविळ नेत्यांना फैलावर घेतले. ते म्हणाले की, मध्यंतरी कोणता तरी पठ्ठ्या म्हटला की, दादांचा दौरा मी रद्द केला. अजित पवारने आखलेला दौरा रद्द करायला अजून माणूस जन्माला यायचाय, अशा शब्दात त्यांनी त्या पठ्ठ्याला ठणकावले. पंतप्रधानांच्या कार्यक्रमामुळे मी म ाझा दौरा पुढे ढकलल्याची माहिती त्यांनी दिली. बैलगाडी खाली एक कुत्रे चाललेले असते, त्याला वाटते मीच गाडी आढतोय. पण, अरे तुझ्या पुढे बैलं आहेत, ती ही गाडी ओढतात,असे सूचक उदाहरण देवून त्यांनी कुरघोडी करणाऱ्यांना कानपिचक्या दिल्या.



**तटकरेंची कबुली :** एखादा मतदारसंघ राखीव झाल्यानंतर कर्तृत्व माणसाला संधी मिळत नसते. पण, आता आमची जबाबदारी आहे. राजन पाटील यांना योग्य पद्धतीने सन्मान देण्याचे काम अजितदादांच्या नेतृत्वाखाली शंभर टक्के घडेल,अशी ग्वाही सुनील तटकरे यांनी देताच सभेत टाळ्यांचा कडकडाट झाला. मोहोळ मतदारसंघ राखीव होऊनही माजी आमदार राजन पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा आमदार सलग तीन निवडणुकांमधून निवडून आणला आहे, अशी कामगिरी करणारे ते राजन पाटील हे एकमेव नेते आहेत. पण मला याही गोष्टीची खंत आहे की पक्षाला प्रचंड ताकद देऊनसुद्धा राजन पाटलांना न्याय देण्यात आम्ही कमी पडलो, अशी कबुली तटकरे यांनी दिली.अजितदादांचाही रोख उमेश पाटलांवर होता,अशी चर्चा सभेनंतर कानावर पडली.

### मग त्यांना जागा दाखवू

मोहोळचे आमदार यशवंत माने यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील यांचे नाव न घेता पक्षाचे अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे तक्रार केली.त्याविषयी बोलताना तटकरे यांनी नाव न घेता उमेश पाटील यांना कडक शब्दांत इशारा दिला. 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विरोधात जो कोणी भूमिका घेईल. त्याला त्याची जागा दाखवण्याचे काम पक्ष नक्की करेल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बेशिस्ती खपवून घेतली जाणार नाही,असा इशारा तटकरे यांनी दिला.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिस्तीतच चालेल,असे त्यांनी निक्षून सांगितले.

### बाळराजेंच्या नेतृत्वाची प्रशंसा

बाळराजे ऊर्फ विक्रांत पाटील हे मोहोळ परिसरातील शेतकऱ्यांचा हिताचा विचार करणारे नेतृत्व आहे. ज्या पोटतिडकीने त्यांनी प्रश्न म ांडले, ते या भागातील उद्याचे नेतृत्व कशा पद्धतीने काम करतेय, याची ती झलक होती. राज्यात तरुण नेतृत्वाची फळी उभी करण्याचे काम अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. त्याामध्ये आमचा हा मोहोळचा तरुण उद्याच्या महाराष्ट्राच्या राजकारणात शंभर टक्के पाहायला मिळेल, असा विश्वासही तटकरे यांनी व्यक्त केला.

### करमणुकीची जबाबदारी...

आपण दिलेला उमेदवार आगामी विधानसभा निवडणुकीत मोठ्या मताधिक्क्याने निवडून येणार आहे; म्हणून विरोधकांबरोबर संधान साधून माजी आमदार राजन पाटील, त्यांची दोन्ही मुले आणि माझ्यावर वेगवेगळ्या प्रकारचे आरोप केले जात आहेत. आमच्याविषयी खालच्या पातळीची भाषा वापरली जाते. हे कुठेतरी थांबणे गरजेचे आहे आणि आपण त्यावर निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार यशवंत माने यांनी आपल्या भाषणातून केली होती.

---

## जमिनीच्या वादातून कुऱ्हाडीने मारहाण

### पती-पत्नी जखमी

✔ **सोलापूर** : जमिनीच्या वादातून कुऱ्हाड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत पती-पत्नी जखमी झाले. ही घटना मुळेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. मुरलीधर भारत काळे (वय ६५) आणि त्यांची पत्नी गौराबाई काळे (वय ५५ दोघे रा.मुळेगाव) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना म्बुलन्स मधून रात्री सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जमिनीच्या वादातून त्यांना अर्जुन काळे आणि इतर ५ जणांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## वागदरीत तरूणाला जीवे मारण्याचा प्रयत्न

### तीन आरोपी अटकेत

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

तालुक्यातील वागदरी येथे शुक्रवारी (दि.२० संप्टेबर) रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास वागदरी ते अक्कलकोट जाणारे रोडवर वागदरी शिवारात दोन महिन्यापूर्वी मोबाईलवर झालेल्या मागील वादाचा राग मनात धरुन चार आरोपींनी कोणत्यातरी लोखंडी धारदार हत्याराने १८ वर्षीय तरूणाच्या डोक्यात मारुन गंभीर जखमी केल्याची घटना घडली.

यातील तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अहमद शब्बीर शेख (वय १९), प्रकाश सिद्धता सोनकांबळे (वय २०) दोघे रा. पुणे) व प्रेमरतन उर्फ बापू लक्ष्मण मुंदीनकेरी (रा. वागदरी, ता. अक्कलकोट) असे तिघांची नांवे आहे. तर आरोपी जावेद शेख हा अद्याप फरारी आहे.



याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, २० सप्टेंबर रोजी रात्री पावणेदहा वा. चे सुमारास वागदरी ते अक्कलकोट जाणारे मुख्य रोडवर सिध्दगंगा ढाब्यापासून काही अंतरावर दोन महिन्यांपूर्वी फिर्यादीचा अहमद याचेसोबत झालेल्या मोबाईलवर वादाचा राग मनात धरुन अहमद शेख, जावेद शेख, प्रकाश सोनकांबळे व प्रेमरतन उर्फ बापू मुंदीनकेरी यांनी संगनमत करुन अहमद शेख याने पायाने फिर्यादीचे पोटात मारल्यावर फिर्यादी जमिनीवर पडला. तेव्हा प्रेमरतन मुंदीनकेरी याने फिर्यादीस लाथाने मारहाण केली.

प्रकाश सोनकांबळे याने माझे मित्राशी वाद घालता काय? असे म्हणुन शिविगाळ, दमदाटी करत फिर्यादीच्या शर्टाची गच्ची धरुन उठल्यावर जावेद शेख याने हातात दगड घेवून त्या दगडाने फिर्यादीचे डावे मानेवर, छातीवर डावे बाजूस व डावे खांदावर जबर मारले.

अहमद शेख याने तु आता यापुढे माझ्याशी पुन्हा वाद घालणार नाहीस, तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणून फिर्यादीला जीवे ठार मारण्याचे उद्देशाने कोणत्यातरी लोखंडी धारदार हत्याराने फिर्यादीचे डोकीत मारहाण करून गंभीर जखमी केले म्हणून चौघांविरुध्द तक्रार दाखल झाली आहे.

फिर्याद गोविंद साईनाथ वडतिले (वय १८ वर्षे) व्यवसाय वडापाव गाडा, वागदरी (ता. अक्कलकोट) यांनी दिली. अधिक तपास पोसई आमितकुमार करपे हे करीत आहेत.

## १६ वर्षीय मुलीने केले विष प्राशन

### कुंभारी घरकुल येथील घटना

✔ **सोलापूर** : तक्रार केल्यामुळे आई घरातून निघून गेली.त्यामुळे निराश झालेल्या १६ वर्षीय मुलीने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना कुंभारी घरकुल (ता. दक्षिण सोलापूर) येथील विजयनगरात रविवारी दुपारच्या सुमारास घडली. त्या मुलीचे आईबरोबर भांडण झाले होते. त्यामुळे आई घरातून निघून गेली. त्यानंतर दुपारच्या सुमारास त्या मुलीने अंगणात सडा मारण्याचे पिवळे विषारी रंग प्राशन केली होती.तिला नातेवाईकाने शासकिय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद तालुका पोलीसात झाली आहे.

---

## कोंडबावी येथे कोयता अन् खोऱ्याने मारहाण

### पिता-पुत्र गंभीर; ९ जणांवर गुन्हा

✔ **अकलूज** : मोटर सायकल आडवी का घातली? अशी विचारणा केल्याच्या कारणावरून कोयता, खोऱ्याचा दांडा आणि केबलने केलेल्या मारहाणीत पिता-पुत्र जखमी झाले. ही घटना कोंडबावी (ता .माळशिरस) येथील जाधववस्ती जवळ शुक्रवारी रात्री घडली. या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी ९ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सागर शिवाजी पाटील (वय २५) आणि त्याचे वडील शिवाजी पाटील अशी जखमी पिता-पुत्राची नावे आहेत.

त्यापैकी सागर पाटील याला गंभीर अवस्थेत अकलूजच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी अकलूजच्या पोलिसांनी नवनाथ हनुमंत, रामराजे माने, शिवराज माने, भागवत वाघमारे, शुभम पवार (सर्व रा.कोंडबावी) आणि अन्य चौघे अशा एकूण ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जखमी सागर पाटील याने तुम्ही मोटरसायकल आडवी का घातली? अशी विचारणा केली होती. त्या कारणावरून झालेल्या तक्रारीत वरील आरोपींनी त्यांना मारहाण करून गंभीर जखमी केले .अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार बागडे पुढील तपास करीत आहेत.

## पैसे न दिल्याने महिलेचे देणेकराच्या घराजवळ विष प्राशन

✔ **सोलापूर** : दिलेले पैसे मागण्यासाठी देणेकराच्या घराजवळ गेली असता त्याने पैसे दिल्यास नकार दिला. त्यामुळे एका ३४ वर्षीय महिलेने विषारी द्रव पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केली. ही घटना शास्त्रीनगर परिसरातील २ नंबर बस स्थानकासमोर रविवारी सकाळच्या सुमारास घडली. अंबिका गणेश बिटला (वय ३४ रा. बोळकोटे नगर) असे विष प्राशन केलेल्या महिलेचे नाव आहे. तिला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिने श्रीनिवास गुर्रम (रा.शास्त्रीनगर) याला) पैसे दिले होते. ते पैसे मागण्यासाठी ती रविवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास त्याच्या घरी गेली होती. मात्र त्याने पैसे देत नाही असे सांगितले. त्यामुळे तिने रागाच्या भरात त्याच्या घराजवळ अंगणात सडा मारण्याचे पिवळे विषारी रंग प्राशन केली. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

## मोटारसायकली अन् क्रुझरसह साडेदहा लाखांचा ऐवज लांबविला



✔ **सोलापूर** : शहरातील फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून एक मोटारासायकल व एक क्रुझर तसेच सदर बझार पोलिस ठाण्याच्या हद्दीतून एक मोटारसायकल अशी तीन वाहने चोरून चोरट्याने सुमारे साडेदहा लाखांचा माल लांबविला.

पहिल्या घटनेत दिनेश सिध्दाराम आलुरे (वय ३५ रा. सिध्दमोग नगर, शेळगी) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांची २० हजारांची एमएच १३-बीएफ ३३१८ ही मोटारसायकल एसटी स्टँड कॉलनीतून चोरट्याने चोरून नेली. तपास पोलिस नाईक मुलाणी हे करित आहेत. दुसऱ्या घटनेत दत्ता आणप्पा घोडके (वय ५४ रा. नाथ रेसिडन्सी, मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांची १० लाखांची एमएच २४-बीएल ९२६४ ही क्रुझर मडकी वस्तीतून चोरट्याने चोरून नेली. तपास स.पो.नि. धायगुडे हे करत आहेत. तिसऱ्या घटनेत नरेश शंकर दुरसा (वय ३३ रा. स्वागत नगर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांची एमएच १३-बीझेड ५१९७ ही मोटारसायकल क्रिडा संकुल येथून चोरट्याने चोरून नेली. पुढील तपास हवालदार मुलाणी हे करित आहेत.

---

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



देवा, माझी फसवणूक होणार नाही, असा आशीर्वाद दे!

# येत्या १० दिवसांत जागा वाटप पूर्ण होईल : पवार

## तिकीट वाटपाचा फॉर्म्युलाही सांगितला



✔ बारामती/प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत जागावाटपाबद्दल बैठका पार पडत आहे. २८८ पैकी १२० ते १३० जागांवर महाविकास आघाडीतील तिघन्ही पक्षांत सहमती झाल्याचे बोलले जात आहे. मात्र, येत्या १० दिवसांत जागावाटप पूर्ण होईल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारसाहेब यांनी दिली आहे.

यावेळी राष्ट्रवादीत तिकिटवाटपाचा 'फॉर्म्युला' कसा असणार? जागावाटपानंतर महाविकास आघाडीची पुढील रणनीती कशी असेल? यावरही पवार यांनी भाष्य केले आहे. ते बारामतीत प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते. शरद पवार म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसकडून इच्छुक उमेदवारांचा अभ्यास सुरू आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि अन्य काहींजण इच्छुकांच्या मुलाखती घेतील. नंतर पक्ष इच्छुकांबाबत निर्णय घेईल. तीन पक्ष एकत्र येऊन विधानसभा निवडणूक लढत आहे. एखादी जागा तीन पक्षांत कुणी लढवावी, याबद्दल विचारविनिमय सध्या सुरू आहे. जागावाटपाबद्दल निर्णय झाला की, तिथे कोणाला उमेदवारी द्यायची, याचा निर्णय तो-तो पक्ष घेईल. येत्या १० दिवसांत जागावाटप संपेल. त्यानंतर जनतेत जाऊन आपली भूमिका सांगण्यास सहकारी पक्ष सुरूवात करतील.

### जनता परिवर्तन करण्यास उत्सुक

महाराष्ट्रात महाविकास आघाडीबद्दल अनुकूल वातावरण आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा एक खासदार निवडून आला. तर राष्ट्रवादीचे चार खासदार निवडून आले होते. मात्र, यंदाच्या निवडणुकीच्या ४८ पैकी ३० लोक आमचे निवडून आले आहेत. याचा अर्थ जनता परिवर्तन करण्यास उत्सुक असून सरकार, भाजप आणि त्यांच्या सहकारी पक्षांना बाजूला करण्याच्या मनस्थितीत आहे, असं शरद पवार यांनी म्हटले आहे.

### संजय राऊत यांना सुनावले

नगरमधील श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघावर ठाकरे गटाकडून दावा करत संजय राऊत यांनी येथून पुढचा आमदार हा ठाकरे गटाचाच असेल, असे विधान केले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले की, शिवसेनेचे एक नेते काल तुमच्या तालुक्यात आले होते. तसेच त्यांनी हे आमचे उमेदवार आहेत, असे जाहीर करून टाकले. अशाप्रकारे उमेदवारी जाहीर करण्याचा अधिकार कुणालाही नाही, असे शरद पवार यांनी स्पष्टपणे सांगितले.

# 'वंदे भारत'चा विचका

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेली वंदे भारत एक्सप्रेस आपल्या मतदारसंघातून धावावी यासाठी सर्वपक्षीय खासदार प्रयत्नशील आहेत. त्यासाठी 'वंदे भारत'च्या डबे निर्मितीवर अधिक भर द्यावा लागत आहे. एकीकडे ही स्थिती असताना दुसरीकडे आर्थिक व्यवहार्य असणारे मार्ग आणि रुळांच्या अद्ययावतीकरणाच्या अभावामुळे काही गाड्या वापरात नसल्याचे चित्र समोर आले आहे. त्या या गाडीच्या यश-अपयशावर भलतीच चर्चा सुरू झाली आहे. लोकप्रिय होत असलेल्या या गाडीचे प्रवासभाडे एसी थर्ड टिअर दरापेक्षा अधिक व विमानभाड्यापेक्षा कमी आहे. देशांतर्गत विमान प्रवास करण्यासाठी सर्वसाधारणपणे दीड ते दोन तास लागतात. तर 'वंदे भारत'मधून सात ते आठ तास लागतात. ही गाडी काही मार्गांवर लोकप्रिय आहे. पण काही मार्गांवर अपेक्षित प्रतिसाद नाही. यासाठी गाडी सुरू करण्यात आलेल्या दोन शहरातील व्यापार, शिक्षण, नोकरी, उद्योगधंदे हे सर्व घटक कारणीभूत आहेत. त्यामुळे काही मार्गावर १६ ऐवजी ८ डब्यांची गाडी करण्यात आली आहे. तर आता काही मार्गावर २० डब्यांची देखील गाडी चालवण्यात येत आहे. भारतातील सर्वात आधुनिक गाड्यांपैकी वंदे भारत एक्स्प्रेस आहे. तिची वेगमर्यादा ताशी १६० प्रति किलोमीटर इतकी आहे. सध्या १३० प्रति किलोमीटर या वेगाने ती धावते. ही गाडी स्वदेशी बनावटीची आहे. तिची ओळख अधिक गती आणि वजनाने हलकी अशी आहे. आठ डब्यांची गाडी तयार करण्यासाठी सुमारे ५२ कोटींचा खर्च येतो. १६ सप्टेंबर २०२४ पर्यंत भारतात ६६ वंदे भारत एक्सप्रेस गाड्या सेवेत होत्या. यामध्ये २० गाड्या १६ डब्यांच्या, तीन गाड्या २० डब्यांच्या आणि ४३ गाड्या आठ डब्यांच्या आहे. तर ८ डब्यांच्या १६ वंदे भारत एक्सप्रेस तयार आहेत. त्यावर सुमारे ८०० कोटींहून अधिक खर्च झाला आहे. पण, कोणत्या मार्गावर चालवाव्यात, हे निश्चित होऊ न शकल्याने गाड्या कारखान्यातच



उभ्या असल्याची माहिती उजेडात आली आहे. नवी दिल्ली-वाराणसी या शहरादरम्यान १५ फेब्रुवारी २०१९ रोजी पहिली वंदे भारत एक्स्प्रेस धावली. त्यानंतर नागपूर-बिलासपूर, नागपूर-इंदूर आणि नागपूर-सिकंदराबाद, कोल्हापूर-पुणे, पुणे-हुबळी, मुंबई-गोवा, नवी दिल्ली-माता वैष्णोदेवी कटरा (जम्मू-काश्मीर), गांधीनगर-मुंबई, नवी दिल्ली-आंब अंदुरा (हिमाचल प्रदेश), चेन्नई-म्हैसूर, हावडा-न्यू जलपाईगुडी, सिकंदराबाद-विशाखापट्टणम्, मुंबई-सोलापूर आणि मुंबई-शिर्डी यासह ६६ वंदे भारत सुरू झाल्या. वंदे भारतसारखी 'हाय-स्पीड' गाडी चालवण्यासाठी अद्ययावत रुळांची आवश्यकता आहे. तसेच अत्याधुनिक सिग्नल यंत्रणाही हवी. देशात असे काही मार्ग आहेत ज्यांवरून १३०-१६० कि. मी. प्रतितास वेगाने गाडी धावू शकते. पण, ते मार्ग आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाहीत. तसेच या मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस चालवल्यास इतर गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आठ डब्यांच्या १६ वंदे भारत एक्सप्रेस धावण्याच्या प्रतिक्षेत आहेत. ही गाडी जास्तीत जास्त आठ तासांचा प्रवास करू शकते. त्यामुळे ज्या दोन शहराचे अंतर सात ते आठ तासांत कापता येईल आणि ज्या मार्गावर प्रवाशांची गर्दी अधिक असेल, त्या मार्गाची निवड केली जाते. ही गाडी मध्यरात्रीपासून पहाटे ५ पर्यंतच्या काळात धावत नाही. आठ डब्यांच्या एका वंदे भारत एक्सप्रेसमधून सुमारे ५०० लोक प्रवास करू शकतात. एक 'वंदे भारत' ज्या मार्गावरून धावते त्या मार्गावरील नियमित धावणाऱ्या इतर चार ते पाच गाड्यांचे वेळापत्रक प्रभावित होते. म्हणजे सुमारे वंदे भारतच्या पाचशे प्रवाशांसाठी पाच हजार प्रवाशांना त्याचा फटका बसतो. त्यातूनच नियमित धावणाऱ्या गाड्यांच्या प्रवाशांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे दिसून येते. परिणामी, या गाडीबाबत नकारात्मक भावना निर्माण होत असल्याचे बोलले जात आहे. काही गाड्यांवर दगडफेकदेखील झाली आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. शिवाय ती दिवसेंदिवस वाढतच आहे. सणासुदीच्या काळात आणि उन्हाळ्यात तर आरक्षित तिकिट कन्फर्म होणे अशक्यप्राय गोष्ट असते. देशातील बहुतांश प्रवाशांचा कल स्वस्त दरातील प्रवास करण्याकडे असतो. त्यामुळे वंदे भारतचे भाडे सर्वसाधारण प्रवाशांना अधिक वाटत आहे. लोकप्रियतेसाठी सरकार अशा योजना आणल्यास प्रशासनाला ती राबवायला तारेवरची कसरत करावी लागते. रेल्वे प्रशासनाचे तेच हाल चालले आहे. सरकारी घाईने योजनांचा कसा विचका होते हे 'वंदे भारत'वरून म्हणता येईल.

राजकीय

# केजरीवालांचा जुगार

**मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊन पुन्हा जनतेकडे कौल मागणारे अरविंद केजरीवाल हे देशातील एकमेव मुख्यमंत्री असावेत. शेकडो कोटी रुपयांच्या मद्य घोटाळ्याच्या आरोपावरून त्यांच्यावर ईडी आणि सीबीआयकडून चौकशी चालू आहे. तब्बल १७७ दिवस तिहारच्या तुरुंगात काढल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांची जामिनावर मुक्तता केली आणि जेलमधून बाहेर पडताच त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा दोन दिवसांत राजीनामा देणार असल्याची घोषणा केली. केजरीवाल यांनी आपला वारस म्हणून आतिशी यांना पसंती दिली. सरकारमध्ये ते कोणत्याही पदावर नाहीत, हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीत ते आपच्या उमेदवारांच्या प्रचारात भाग घ्यायला ते मोकळे आहेत. मी गुन्हेगार आहे की प्रामाणिक आहे, हे दिल्लीतील जनतेने ठरवावे. मी दोषी आहे की निरपराध आहे, हे दिल्लीतील मतदारांनी निवडणुकीत सांगावे, अशी त्यांनी भूमिका मांडली आहे. मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊन जनतेकडे कौल मागण्यासाठी त्यांनी जुगार खेळला आहे.**

---

राजकारणात सत्ता हे सर्वस्वी असते. ज्यांना सत्ता मिळते, त्यांना मुख्यमंत्रिपद हे सर्वस्व वाटत असते. मुख्यमंत्रिपदासाठी दुसरे कोण स्पर्धक नकोत म्हणून प्रत्येक राजकीय नेता सतर्क असतो. मुख्यमंत्रिपदासाठी सर्व पैसा, प्रतिष्ठा व ताकद पणाला लावणारे अनेक आहेत. मुख्यमंत्रिपद मिळावे म्हणून हायकमांडला साकडे घालतात, पक्षाच्या आमदारांना आमिषे दाखवतात, आमदार दुसरीकडे जाऊ नयेत म्हणून त्यांना दुसऱ्या राज्यात नेऊन रिसॉर्ट किंवा पंचतारांकित हॉटेलवर नेऊन ठेवतात. पण आपल्या पाठीशी पक्षाचे भक्कम बहुमत असतानाही मुख्यमंत्रिपदाचा त्याग करणारे अरविंद केजरीवाल देशात एकमेव नेता असतील. केजरीवाल यांच्या निर्णयाने पक्षाला पुन्हा तेज येईल, कार्यकर्ते सक्रिय होतील, पक्षाला आलेली मरगळ झटकली जाईल, ज्या दिल्लीकरांनी लोकसभा निवडणुकीत दिल्लीतील सर्व ७ जागांवर भाजपाला निवडून दिले, ते मतदार विधानसभा निवडणुकीत पुन्हा आपकडे आकर्षित होतील, अशी गणिते मांडली जात आहेत.

मद्य घोटाळ्यातील आरोपी असणारे केजरीवाल यांनी खरे तर ईडीने अटक केल्यावरच राजीनामा द्यायला हवा होता. रांचीमध्ये हेमंत सोरेन यांच्याकडे ईडीची तुकडी धडकली तेव्हा लगेचच झारखंडच्या मुख्यमंत्रिपदाचा त्यांनी राजीनामा दिला होता, मग जेलमध्ये गेल्यावरही केजरीवाल सहा महिने मुख्यमंत्रिपदाला का चिकटून राहिले? केजरीवाल यांना मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीचा मोह सुटत नाही असा त्यातून संदेश गेला. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अँटी इन्कबन्सीचा फटका बसू नये, म्हणून केजरीवाल यांनी जेलमधून बाहेर येताच मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची धूर्त खेळी खेळली आहे. सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांची जामिनावर सुटका केली असली तरी त्यांच्यावर काही कडक निर्बंध लादले आहेत. ते मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात जाऊ शकत नाहीत, मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसू शकत नाहीत. मुख्यमंत्री म्हणून कोणत्याही फाईलवर स्वाक्षरी करू शकत नाहीत. शेवटी मुख्यमंत्रिपद कागदावरच राहणार असेल तर त्याचा उपयोग तरी काय?

लोकसभा निवडणुकीत देशपातळीवर भाजपाप्रणीत एनडीएची फार मोठी घसरण झाली आहे. महाराष्ट्रात एनडीएच्या खासदारांची संख्या २३ ने घटली आहे, झारखंडमध्ये ९ तर हरियाणात ५ खासदार कमी




झाले आहेत. आम आदमी पक्षाच्या विस्ताराची हीच योग्य वेळ आहे, असे केजरीवाल यांना वाटत असावे. या तिन्ही राज्यांत विधानसभा निवडणुकीत केजरीवाल प्रचाराला आता सक्रिय राहू शकतील. दिल्ली महापालिकेच्या एकूण २५० जागा आहेत, पैकी १३४ जागांवर आम आदमी पक्षाने विजय मिळवला आहे. आता केजरीवाल यांचे लक्ष्य पुन्हा दिल्ली विधानसभा आहे.

४३ वर्षांच्या आतिशी या तात्पुरती व्यवस्था म्हणून मुख्यमंत्री झाल्या आहेत. सन २०२० मध्ये कालकाजी मतदारसंघातून त्या आपच्या आमदार म्हणून निवडून आल्या. २०२३ मध्ये मंत्री झाल्या व २०२४ मध्ये मुख्यमंत्री झाल्या. केजरीवाल यांच्याशी त्या निष्ठावान आहेत. काँग्रेसने मात्र 'केजरीवालांची बाहुली' अशी टीका आतिशी यांच्यावर केली आहे. केंद्रातील भाजपा सरकारने केजरीवाल यांना मुख्यमंत्री असताना नेहमीच उपराज्यपालांच्या नियंत्रणाखाली ठेवले होते. नोकरशहांच्या नेमणुका व बदल्यांचे सर्व महत्त्वाचे अधिकार हे उपराज्यपालांना केंद्राने दिले आहेत. केजरीवाल यांचे हात केंद्राने बांधून ठेवले होतेच. आता मुख्यमंत्रिपदावर आलेल्या आतिशी वेगळे काय करू शकणार?

दिल्लीची लोकसंख्या दोन कोटींवर गेली आहे. दिल्लीतील वाहनांची संख्या ८० लाखांवर पोहोचली आहे. दिल्लीचा मुख्यमंत्री हे प्रतिष्ठेचे पद असले तरी केंद्र सरकारने या पदाला फारच मर्यादित अधिकार दिले आहेत. आतिशी या उच्चशिक्षित आहेत. दिल्लीच्या स्प्रिंडल स्कूलमधून त्यांचे शिक्षण झाले, नंतर सेंट स्टिफन कॉलेज व ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतून त्यांनी उच्च शिक्षण घेतले. त्यांचे नाव आतिशी मार्लेना सिंग आहे, त्यांच्या आडनावामुळे त्या ख्रिश्चन आहेत असा समज होतो. केजरीवाल व सिसोदिया हे जेलमध्ये असताना सरकारमधील १४ खाती त्यांनी समर्थपणे सांभाळली. हरियाणा सरकारने दिल्लीला रोज १०० दशलक्ष गॅलन पाणी देण्यास नकार दिल्यानंतर त्या जून महिन्यात उपोषणाला बसल्या होत्या. आपल्या मस्तकावर मुख्यमंत्रिपदाचा मुकुट चढेल याची आतिशी यांनीही कधीच कल्पना केली नव्हती. आतिशी, केजरीवाल यांना गुरुस्थानी मानतात.

केजरीवाल यांचा मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा हा स्टंट असल्याचा आरोप भाजपाने केला आहे. केजरीवाल, सिसोदिया, सत्येंद्र जैन अशा आपच्या नेत्यांना महिनोन्महिने केंद्रीय चौकशी यंत्रणांनी जेलमध्ये डांबले. केजरीवाल यांना जामीन मंजूर करताना सर्वोच्च न्यायालयाने ईडी व सीबीआयवर कडक ताशेरेही ओढलेत. 'पोपट असल्यासारखे वागू नका', अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयला फटकारले आहे. केजरीवाल यांनी राजीनामा दिला नसता, तर भाजपाने दिल्ली विधानसभा निवडणुकीत भ्रष्टाचार हाच प्रचाराचा प्रमुख मुद्दा बनवला असता. केजरीवाल हे भ्रष्टाचारी व बेईमान आहेत, असे चित्र भाजपा निर्माण करीत आहे. केजरीवाल यांच्या काळात वृद्धांचे पेन्शन बंद झाले, दिल्लीत टँकर माफिया वाढले, नाले सफाई झाली नाही, पावसाचे पाणी घुसल्याने निरपराध विद्यार्थ्यांचे मृत्यू झाले. मद्य विक्रीत महाघोटाळा झाला. उन्हाळ्यात दिल्लीत पाणीटंचाई, मंदिर-गुरुद्वारासमोर मद्य विक्रीची दुकाने अशा आरोपांच्या फैरी रोज झाडत आहेत. केजरीवाल यांची जामिनावर सुटका झाल्यानंतर भाजपा व आपमधील आरोप-प्रत्यारोपांना आणखी धार चढली आहे.

**- सुकृत खांडेकर.**

टुडेज् ब्लॉग

# आकांक्षांपुढती जिथे गगन ठेंगणे

रेल्वेदेखील नसलेल्या अत्यंत आदिवासी बहुल भागातून आलेली अनुप्रिया. नागरी उड्डाण क्षेत्रात जायचं तिचं स्वप्नं होतं. या क्षेत्रात यायचं म्हणजे मुलींचे प्राधान्य हे अनेकदा एअरहोस्टेस होण्याला असते किंवा मग ऑफिस जॉब निवडला जातो. पण, या सगळ्या समजुती बाजूला सारत अनुप्रियाने स्वप्न बघितलं ते थेट वैमानिक होण्याचं आणि आता तिचं हे स्वप्न तिने पूर्ण केलं आहे. असाच एक पराक्रम करणारी दुसरी महिला म्हणजे मोहना सिंग. मोहना सिंग या पहिल्या लढाऊ महिला वैमानिक ठरल्या आहेत. भारतीय हवाई दलाच्या प्रतिष्ठित १८ फ्लाईंग बुलेट स्क्वाड्रनमध्ये त्यांचा समावेश झाला असून यासोबत त्यांनी एक इतिहास रचला आहे. मोहना सिंग यांनी देशातच विकसित करण्यात आलेले एलसीए तेजस हे लढाऊ विमान चालवले.

मलकानगिरी, ओडिशातील एक आदिवासी बहुल जिल्हा. इथे जाण्याचा रस्ता शोधू पहाल तर विमानमार्ग लांबच राहिला पण हा जिल्हा रेल्वेनेदेखील जोडलेला नाही. आदिवासी बहुल जिल्हा असल्याने रस्त्यांची अवस्था बिकटच. अशा भागातील एका मुलीने फार मोठे स्वप्न पाहिले आणि ते पूर्ण करण्याची जिद्द ठेवली. आपले स्वप्न पूर्ण करणारी ही मुलगी म्हणजे अनुप्रिया लाकरा. महिला सध्या प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत.

आपल्या कर्तृत्वाने त्या जिथे जातील तिथे आपल्या कामाचा ठसा उमटवत आहेत. देशातील सर्वोच्च पदेदेखील अनेकदा महिलांनी भूषवली आहेत. अगदी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या सगळ्या क्षेत्रात कार्यरत असतात, असं आपण नेहमीच म्हणतो. पण अशा काही घटना या महिलांची दुर्दम्य इच्छाशक्ती दर्शवतात. मुळातच जे करायचं, ज्याची इच्छा बाळगायची,



ते झोकूनच करायचं ही महिलांची नैसर्गिक प्रवृत्ती आहे आणि त्यामुळेच कोणत्याही क्षेत्रात असल्या तरी त्या आपल्या याच वृत्तीने काम करत राहतात.


अनुप्रियाचं विशेष कौतुक यासाठी आहे की, ती ज्या भागातून येते तिथे एकतर मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव आहे. शिवाय हा भाग माओवादाने प्रभावित आहे. त्यामुळे तेथील वातावरण काय असेल याची आपण केवळ कल्पनाच करू शकतो. अशा बऱ्यापैकी प्रतिकूल वातावरणात वाढलेल्या अनुप्रियाने हे स्वप्न बघणं कौतुकास्पद तर आहेच, पण त्याहीपेक्षा कौतुक आहे ते स्वप्नपूर्तीचा ध्यास घेण्याचे. अनुप्रियाचे वडील या भागातील पोलीस कॉन्स्टेबल. म्हणजे तशी आव्हानांना, संकटांना सामोरे जाणं हे काही तिला नवीन नाही. ही या भागातली पहिली आदिवासी महिला पायलट आहे. विशेष म्हणजे, अनुप्रिया सुरुवातीला २०१२ मध्ये इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होती. मात्र, त्यानंतर तिने ते शिक्षण अर्धवट सोडले आणि वैमानिकाचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. तिची ही मेहनत तिच्याच भागातील अन्य मुलींसाठी प्रेरणादायी ठरेल हे नक्की. ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी अनुप्रियाचे अभिनंदन केले असून इतर मुलींनीही तिचा आदर्श घ्यावा असे म्हटले आहे. पण, मग तिच्या मनात काय आलं आणि तिने अचानक ते शिक्षण सोडून वैमानिक बनण्याचे ठरवले आणि मग त्याप्रमाणे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. खरं तर कुटुंबाची आर्थिक परिस्थिती काही फार संपन्न अशी नव्हती. त्यामुळे अनुप्रियाचे हे शिक्षण त्यांना जरासे जडच जात होते. पण, याचा अनुप्रियाच्या ध्येयात काहीही अडथळा आला नाही. तिची इच्छाशक्ती एवढी दांडगी होती, शिवाय तिची मेहनत करण्याची तयारी होती, त्यामुळे मार्गात येणाऱ्या सगळ्या अडचणी दूर करत ती वाटचाल करत राहिली.

असाच एक पराक्रम करणारी दुसरी महिला म्हणजे मोहना सिंग. मोहना सिंग या पहिल्या लढाऊ महिला वैमानिक ठरल्या आहेत. भारतीय हवाई दलाच्या प्रतिष्ठित १८ फ्लाईंग बुलेट स्क्वाड्रनमध्ये त्यांचा समावेश झाला असून यासोबत त्यांनी एक इतिहास रचला आहे. मनाच्या या शक्तीच्या जोरावरच महिला अलीकडे नवनवीन क्षेत्रं पादाक्रांत करताना दिसतात. वैमानिकांच्या क्षेत्राबद्दल बोलायचं झालं तर एक खूपच उल्लेखनीय बाब समोर येते ती म्हणजे देशभरात जितके वैमानिक आहेत, त्यातील १५ टक्के वैमानिक या महिला आहेत. विशेष म्हणजे, भारतीय महिला वैमानिकांचे हे प्रमाण जगभरात सर्वाधिक आहे.

**- आश्विनी भाटवडेकर.**

जन्म हा अखेरचा

# ज्ञानशून्यस्थल



आत्मज्ञानसंपन्न शिवयोगी स्व-रूपात स्थिर असतो. त्याला हा मी- तो दुसरा, हा आपला- तो परका अशा भेदांची जाणीव नसते. कारण त्याच्या दृष्टींत दुसरी वस्तूच अस्तित्वात नसते. तो स्वतःच विश्वरूप झालेला असतो. तो स्वतः ज्ञानरूप असला तरी त्याच्याकडून ज्ञान व्यवहार घडत नाही. अशा शिवयोग्याची अवस्था कशी असते? तो कसा राहतो? हे पुढील श्लोकात सांगितले आहे :-

**जले जलमिव न्यस्तं वह्नौ वह्निरिवार्पितम्। परे ब्रह्मणि लीनात्मा विभागेन न दृश्यते २०.६१।।**

पाण्यामध्ये पाणी मिसळावे, अग्नीमध्ये अग्नी एकरूप व्हावा त्याप्रमाणे भावाभावरहित शिवयोगी परब्रह्माशी एकरूप होतो, त्याचे निराळे अस्तित्व राहत नाही. पाण्यात पाणी मिसळले तर ते वेगळे करता येत नाही, परंतु पाण्यात दूध मिसळले तर मात्र ते वेगळे करता येते.

हंस आपल्या चोचीने पाण्यातील दूध वेगळे करतो अशी समजूत आहे. आपण हंस नसलो तरी दुधात मिठाचा खडा टाकला की, त्यातील पाणी आणि दूध वेगळे दिसू लागते. पाण्यात पाणी मिसळले तर मात्र असे करता येत नाही. कारण पाण्याचा स्वभाव आणि स्वरूप एक असते. दूध आणि पाणी एकत्र मिसळतात, परंतु ते एकरूप मात्र होत नाहीत. पाण्यात पाणी मिसळते त्याप्रमाणे शिवयोगी परब्रह्माशी एकरुप होतो. अखंड समरस स्थितीत असल्यामुळे त्याच्या ठिकाणी भेदज्ञान राहत नाही. म्हणून या स्थितीला 'ज्ञानशून्यस्थल' असे म्हणतात. परशिवब्रह्म आणि शिवयोगी यांची समरसता ही हानी किंवा वृद्धी होणारी समरसता नाही. एका भांड्यातले पाणी दुसऱ्या भांड्यात टाकल्यावर पहिल्या भांड्यातले पाणी कमी होते आणि दुसऱ्या भांड्यातले पाणी वाढते. जीव-शिवाच्या समरसतेत अशी हानी-वृद्धी नसते. जीवात्मा परमात्म्याशी कसा एकरूप होतो हे सांगताना समुद्रात विलीन होणाऱ्या नदीचे उदाहरण दिले जाते.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# 'परिवर्तन महाशक्ती' गेम चेंजर ठरणार

महाराष्ट्रामध्ये आगामी काळात होवू घातलेल्या विधानसभेसाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरकस तयारी सुरु केली आहे. नोव्हेंबरमध्ये निवडणुका होतील असे सांगितले जात आहे. त्याचं पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडीशिवाय महाराष्ट्रातील जनतेला आता तिसरा पर्याय उभा राहिल्याचे समोर आले आहे.

संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी, वामनराव चटप, शंकर आण्णा धोंडगे, नारायणराव अंकुशे, बच्चू कडू यांनी नुकताच पुण्यात बैठक घेऊन 'परिवर्तन महाशक्ती' या नावाने तिसऱ्या आघाडीवर शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात तिसरी आघाडी गेम चेंजर ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. महायुती सरकारचा कारभार पाहून जनतेला कंटाळा आला आहे. केंद्रसरकारची हस्तक असलेली महायुती महाराष्ट्रात द्वेषाचे राजकारण करत असल्याचे विरोधी पक्षांकडून सातत्याने म्हटले जात आहे, महागाईचा आगडोंब, भ्रष्टाचार, बेरोजगारी, शेतकरी विरोधी, खून, मारामारी, बलात्कार यांना पायबंद घालण्यात महायुतीचे सरकार सपशेल अपयशी ठरले आहे.

स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजीराजे छत्रपती यांनी म्हटले आहे की, 'महाराष्ट्रातील जनता अस्वस्थ झालेली असून त्यांना सक्षम, सुसंस्कृत आणि आश्वासक पर्याय देण्याचा आमचा प्रयत्न राहील आगामी काळात ज्योती मेटे, मनोज जरांगे, प्रकाश आंबेडकर, हे सुद्धा 'परिवर्तन महाशक्ती' मध्ये सामील होतील असे राजकिय गोटातून तर्क लावले जात आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणाचा सातबारा कोणत्याही पक्षाच्या नावावर केलेला नाही असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी वक्तव्य करुन धमाल उडवून दिली आहे. तिसऱ्या आघाडीमुळे महाराष्ट्रातील राजकारण वेगळ्या वळणारं जात असल्याचे दिसून येते आहे. 'परिवर्तन महाशक्ती' मध्ये दाखल व्हायचे असेल त्यांच्यासाठी आमचे दरवाजे उघडे असतील असेही शेट्टी म्हणाले आहेत. त्यामुळे तिसऱ्या आघाडीचा पहिला मेळावा २६ सप्टेंबरला छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होतो आहे. त्यावेळी 'परिवर्तन महाशक्ती'च्या गळाला कोणकोण लागतात ते पाहणे मोठे रंजक ठरणारं आहे ! - **राजू जाधव, जि. बेळगाव.**

# महिला मुख्यमंत्री होणे सोपे नाही!

पुरोगामी राज्य म्हटल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात गेल्या सहा दशकांमध्ये एकदाही महिला मुख्यमंत्री झालेल्या नाहीत. यंदा दिल्लीमध्ये महिला नेत्याला तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची संधी मिळत असताना विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातही महिला मुख्यमंत्री झाली पाहिजे याची चर्चा सुरू आहे. काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी महाविकास आघाडीशी संबंधित दोन महिला नेत्यांची नावे घेऊन त्या मुख्यमंत्रिपदासाठी योग्य असल्याचे म्हटले. त्यातील पहिल्या आहेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष आणि बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे, तर दुसऱ्या आहेत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे. महाराष्ट्र हे पुरोगामी गणले जात असले तरी आजवरचा राज्याचा राजकीय इतिहास पुरुषसत्ताक राहिलेला आहे. त्यामुळे महिला मुख्यमंत्री होणे सोपे नाही.

निवडणूक नोव्हेंबरमध्ये होईल किंवा जानेवारी २०२५ मध्ये होईल, मात्र ही निवडणूक महाराष्ट्राच्या आजपर्यंतच्या निवडणुकांपेक्षा वेगळी असणार आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीला जेवढा उशीर होत आहे, तेवढे नवे मुद्दे या निवडणुकीत चर्चेला येत आहेत. महिला सुरक्षेचा मुद्दा या निवडणुकीत कळीचा ठरण्याची शक्यता आहे, तर महिला मुख्यमंत्री करण्याचाही मुद्दा पुढे आला आहे. दिल्लीनंतर आता महाराष्ट्रातही महिला मुख्यमंत्री व्हावी, अशी मागणी पुढे येऊ लागली आहे.

महाराष्ट्रात मुख्यमंत्रिपदाचा चेहरा पुढे करून सहसा निवडणुका झालेल्या नाहीत. यंदा मात्र महाविकास आघाडीतील प्रमुख घटक पक्ष शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी ही मागणी जोरकसपणे केली आहे. महाविकास आघाडीच्या जाहीर सभांमधून त्यांनी ही मागणी केली आहे, तर महायुतीमध्येही मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावरून धुसफुस सुरूच आहे. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ मिळालेला नाही. आगामी निवडणुकीत महायुतीची सत्ता आली तर आहे तोच पॅटर्न कायम ठेवावा यासाठी शिंदे गट आग्रही आहे, तर महायुतीतील तिसरा भिडू अजित पवार यांचीही मुख्यमंत्रिपदाची इच्छा लपून राहिलेली नाही.

महायुतीच्या तीन प्रमुख नेत्यांमध्ये अजित पवार हे सर्वात सीनिअर आहेत. त्यामुळे ते मला मुख्यमंत्री करा, असे जाहीरपणे म्हणत नसले तरी आगामी निवडणुकीनंतर तिन्ही पक्ष एकत्र बसून निर्णय घेऊ असे सांगून ते मला त्या पदात रस नाही असेही म्हणत नाहीत. असेच काहीसे उत्तर हे देवेंद्र फडणवीसदेखील मुख्यमंत्री कोण होणार, या प्रश्नावर देत असतात.



त्यामुळेच पुरुषांच्या या सत्तास्पर्धेत यंदा महिलेलाही संधी देण्याची मागणी होत आहे.

राज्यातील दोन्ही प्रमुख आघाड्यांमध्ये राज्याच्या प्रमुख पदाबद्दल अशी अंतर्गत धुसफुस सुरू असताना राज्याच्या राजधानीतील अवघ्या १२ वर्षांपूर्वी जन्माला आलेल्या पक्षाने कोणताही गाजावाजा न करता, काहीही आढेवेढे न घेता कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या आतिशी यांना त्यांच्या पक्ष कार्य आणि त्यांच्या बुद्धिमत्तेच्या जोरावर राज्याचा गाडा हाकण्याची संधी दिली आहे, मात्र २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या वेळेस त्यांच्या नावातील 'मार्लेना' शब्दावरून राजकारण सुरू झाले आणि मग त्यांनी त्यांचे आडनाव सिंह लावण्यास सुरुवात केली. अशा ४३ वर्षांच्या आतिशी दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री होत आहेत. त्याआधी भाजपच्या सुषमा स्वराज, काँग्रेसच्या शीला दीक्षित या दोन महिला नेत्यांनी हे पद भूषवले आहे.

खासदार सुळे या २००६ पासून संसदीय राजकारणात आहेत. सुरुवातीला राज्यसभेवर त्यांची निवड झाली. २००९ पासून त्या बारामती लोकसभा मतदारसंघातून विजयी होत आल्या आहेत. संसदेतील त्यांची भाषणे ही अभ्यासपूर्ण आणि सत्ताधाऱ्यांना घाम फोडणारी असतात. संसदेतील त्यांच्या कामकाजाची पावती म्हणून त्यांना 'संसदरत्न' पुरस्कारानेही गौरवण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर त्यांनाही केंद्रात मंत्रिपदाची ऑफर होती, मात्र त्यांनी वडील शरद पवारांसोबत राहण्याचा आणि संघर्षाचा मार्ग निवडला, असे त्यांनी नुकत्याच सांगलीला झालेल्या सभेत म्हटले आहे.

संसदीय राजकारणाचा अनुभव असलेल्या सुप्रिया सुळे या मुख्यमंत्रिपदासाठी योग्य उमेदवार असल्याचा दावा त्यांच्या सहकारी पक्षाच्या महिला खासदाराने केला आहे, तर दुसरे नाव वर्षा गायकवाड यांनी घेतले ते शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे यांचे. रश्मी ठाकरे या उद्धव ठाकरे यांच्यासोबत अनेक सभा, संमेलनांमध्ये असतात. काही आतल्या गोटातील बैठकीतही त्या सहभागी राहत असतील, मात्र सक्रिय राजकारणी अशी त्यांची ओळख नाही. त्यामुळे त्यांच्याच पक्षातून रश्मी ठाकरे यांच्या नावाची चर्चा चुकीची असल्याची पहिली प्रतिक्रिया आली.

पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी या स्वकर्तृत्वाने मुख्यमंत्री झाल्या. दक्षिणेत जयललिता यांचाही राजकीय प्रवास संघर्षातूनच पुढे आलेला होता. उत्तर प्रदेश या सर्वात मोठ्या राज्याने तर देशाला पहिल्या दलित महिला मुख्यमंत्री दिल्या आहेत. मायावती या चार वेळा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री झाल्या. त्या संपूर्ण पाच वर्षांसाठी मुख्यमंत्री राहिल्या नाहीत, मात्र त्यांचा चौथा कार्यकाळ (२००७ ते २०१२) ५८ दिवस कमी पाच वर्षांचा राहिला आहे. जम्मू-काश्मीरसारख्या राज्यातही मेहबूबा मुफ्ती मुख्यमंत्री झाल्या आहेत. तेव्हा महाराष्ट्राचा पुरोगामीपणा नारीशक्तीचे नेतृत्वही मान्य करतो हे दाखवण्याची संधी आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने आली आहे. जिच्या हाती पाळण्याची दोरी, तिच्या हाती राज्याची सूत्रे कुठला राजकीय पक्ष देतो याचीही परीक्षा यंदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने होणार आहे. कारण येथे मुख्यमंत्रिपद मिळवण्यासाठी पुरुषांमध्येच प्रचंड स्पर्धा असते.

**- उन्मेष खंडाळे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

## मराठा आंदोलकांनी अडवला अजितदादांचा ताफा

**सोलापूर :** मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन मराठा समाज आक्रमक झाला आहे. ठिकठिकाणी आंदोलन सुरु आहेत. आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे जनसंवाद यात्रेच्या निमित्ताने सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथे आले होते. यावेळी मराठा आंदोलकांनी भर पावसातच अजित पवारांची गाडी अडवली. तसेच यावेळी त्यांना निवेदनही दिले. अजित पवार यांनी भर पावसात थांबून मराठा समाजाच्या मागण्या ऐकूण घेतल्या

मोहोळ येथील नरखेड फाट्याजवळ अजित पवारांनी पावसात गाडी थांबवून मराठा समाजाचे निवेदन स्वीकारले. यावेळी अजित पवार यांनी भर पावसात थांबून मराठा समाजाच्या मागण्या ऐकूण घेतल्या. लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमच्या निमित्ताने अजित पवार हे आज सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले होते. दरम्यान, मोहोळ येथे काही तासापूर्वी अजित पवारांचा ताफा अडवण्याचा प्रयत्न देखील आंदोलकांनी केला होता.

अजित पवार हे मोहोळ येथून कार्यक्रम उरकून अनगरकडे परत जात होते. यावेळी मुसळधार पाऊस सुरु होता. अशातच हॉटेल स्वराज समोरुन अजित पवार यांचा ताफा जात असताना मराठा आंदोलक घोषणाबाजी करत होते. हे पाहून अजितदादांनी गाडी थांबवून आंदोलकांशी चर्चा केली. तसेच त्यांचे निवेदनही घेतले. मुसळधार पाऊस चालू असूनही ताफा पुढे जात असताना दादांनी गाडी थांबवायला लावली.



## संक्षिप्त वृत्त

### अपघात केला म्हणून तामिळनाडूच्या ड्रायव्हरला मारहाण

**मोहोळ :** टेम्पो धडकल्याने लोखंडी गेटचे नुकसान झाले. भरपाई देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून तामिळनाडूच्या ड्रायव्हरला मारहाण करण्यात आली. ही घटना मोहोळ येथील कादे कॉम्प्लेक्स येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणी मोहोळच्या पोलिसांनी कॉम्प्लेक्सच्या सुपरवायझर विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. के.अजयराज कृष्णन (वय ३४ रा. तामिळनाडू) असे जखमीचे नाव आहे. तो कामती मार्गे पुणे येथे आपला आयशर टेम्पो घेऊन निघाला होता. पहाटेच्या सुमारास समोरच्या वाहनाला वाचविण्याचा प्रयत्नात टेम्पो कादे कॉम्प्लेक्सच्या लोखंडी गेटवर आदळल्याने गेटचे नुकसान झाले होते. कॉम्प्लेक्सचा सुपरवायझर महादेव आबा खरात याने त्याला दीड लाखाची नुकसान भरपाई मागितली. तेंव्हा ड्रायव्हरने गाडी मालकाशी चर्चा करून त्याला सांगतो असे सांगितले. दुपारी ड्रायव्हरने दीड लाख रुपये पैसे देणे होत नाही. आमच्यावर पोलीस केस करा. असे सांगितले होते. त्यामुळे चिडलेल्या सुपरवायझरने ड्रायव्हरला काठीने मारहाण केली. पुढील तपास हवालदार घोडके करीत आहे.

### बार्शी येथे बनावट डीडीद्वारे ७० लाखांची फसवणूक

**बार्शी :** जागेच्या व्यवहारात ७० लाख रुपयाचा डिमांड ड्राफ्ट देऊन जागा मालकाची फसवणूक केल्याची घटना बार्शी येथील रजिस्टर कार्यालयात घडल्याचे नुकतेच उघडकीस आले. याप्रकरणी बार्शी शहरच्या पोलिसांनी सतीश श्रीमंत आरगडे (रा. तावडी ता .बार्शी) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात शिवाजीराव विठ्ठलराव कांबळे (वय ७४ रा.जामगाव रोड बार्शी) यांनी नुकतीच पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांच्या मालकी हक्काची १३१ आर ही जमीन त्यांनी सतीश आरगडे यास ऑक्टोबर २०२३ रोजी १ कोटी २४ लाखास विकली होती .त्यावेळी आरगडे याने ५४ लाख रुपये रोख तर उर्वरित ७० लाख रुपयाची डिडी दिली होती. ती डीडी बनावट असल्याचे निष्पन्न झाले.वेळोवेळी तगादा लावून देखील पैसे देत नसल्याने कांबळे यांनी नुकतीच पोलिसात फसवणुकीची फिर्याद दाखल केली . पुढील तपास फौजदार गळगटे करीत आहेत.

### दवाखान्यातून वृद्धाचे ४७ हजार रुपये पळवले

**पंढरपूर :** बँकेतून प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेतील ४७ हजारांची रोकड घेऊन रुग्णालयात गेले असता चोरट्याने त्या वृद्धइसमाची रोकड असलेली पिशवी पळवली. ही घटना नवीन बस स्थानक जवळील डॉक्टर गांधी क्लिनिकमध्ये बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. या संदर्भात स्वाती नामदे (रा. ओझेवाडी ता.पंढरपूर) यांनी पंढरपूर शहर पोलिसात फिर्याद दाखल केली . त्यांचे सासरे केरप्पा काशिनाथ नामदे (वय ७५) हे बुधवारी दुपारी एकच्या सुमारास पंढरपुरातील बँक ऑफ इंडिया शाखेतून प्रधानमंत्री आवास योजनेतील ४७ रुपये काढले होते. आणि पैसे पिशवीत ठेवून ते डॉ.गांधी क्लिनिक येथे कामासाठी गेले होते. खुर्चीवर पिशवी ठेऊन पाणी पिण्यासाठी गेले असता चोरट्याने रोकड असलेली पिशवी पळवली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार माने पुढील तपास करीत आहेत.

### लक्ष्मीटाकळी येथे चोरट्यांनी नऊ शेळ्या पळवल्या

**पंढरपूर :** पत्र्याच्या शेडमध्ये तसेच घरासमोर बांधलेल्या अशा एकूण १९ शेळ्या चोरट्याने शिताफिने चोरून नेले. ही घटना लक्ष्मीटाकळी (ता.पंढरपूर) येथे शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली. गावात जनावरे चोरीस जाण्याच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने ग्रामस्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. यासंदर्भात बजरंग महादेव देठे (रा.लक्ष्मी टाकळी) यांनी पंढरपूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. ते आपल्या घराजवळील पत्र्याच्या शेडमध्ये ११ शेळ्या तर त्यांच्या घराजवळ राहणारे सुनील देठे हे घरासमोर ८ शेळ्या बांधून ठेवल्या होत्या. पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी दावण तोडून १९ शेळ्या चोरून नेल्या. चोरीस गेलेल्या शेळ्यांची किंमत १ लाख रुपये इतकी असल्याची नोंद पोलिसात झाली. हवालदार गावडे पुढील तपास करीत आहेत.

# महाआघाडीचे ६० टक्के जागांवर एकमत

## ठाकरे अन् काँग्रेस १०० जागा लढवणार? शरद पवार गटाला ८४ जागा; मित्र पक्षांना ४ जागा

**मुंबई/प्रतिनिधी**

**लोकसभेनंतर विधानसभेकडे सगळ्याचे लक्ष लागले आहे. लोकसभेचा 'कॉन्फिडन्स' घेऊन विधानसभा निवडणुकीत सत्ता खेचून आणण्यासाठी महाविकास आघाडी सज्ञ झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर मुंबईत महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या बैठका पार पडल्या. या बैठकीत ६० टक्के जागांवर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), शिवसेनेचे (ठाकरे गट) ठरल्याची माहिती मिळत आहे.**



२०१९ मध्ये नंतर महाराष्ट्रातील राजकीय गणिते बदलली. शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने एकत्र येत महाविकास आघाडी स्थापन केली. आजपर्यंत राष्ट्रवादी आणि काँग्रेसनं शिवसेनेविरुद्ध निवडणुका लढल्या होत्या. त्यामुळे जागावाटपाचा तिढा कसा सोडवणार? असा प्रश्न पडला होता. तसेच, लोकसभेप्रमाणे विधानसभेलाही अनेक मतदारसंघात 'सांगली पॅटर्न'ची भीती आहे. मात्र, बऱ्याच जागांवर महाविकास आघाडीनं तोडगा काढल्याचे सांगितले जात आहे. राज्यात २८८ विधानसभा मतदारसंघ आहे. त्यातील १०० जागा काँग्रेस, १०० जागा ठाकरेंची शिवसेना, तर ८४ जागा शरद पवार यांची राष्ट्रवादी लढणार असल्याची माहिती आहे. मित्र पक्षांनास ४ जागा सोडण्याची तयारी दर्शवल्याचे सांगण्यात येत आहे. अजूनही काही जागांवर तिढा कायम असून तो लवकरच सोडवला जाणार आहे.

### १२० ते १३० जागांवर एकमत?

१२० ते १३० जागांवर महाविकास आघाडीतील तीनही पक्षांमध्ये सहमती झाल्याचं बोलले जात आहे. तिढा असलेल्या जागांवर दुसऱ्या टप्प्यात चर्चा केली जाणार आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जिंकलेल्या जागाच त्या पक्षाला दिल्या आहेत. दहा ते वीस जागांवर अदलाबदल केला जाणार असल्याची माहिती आहे.

### तीनही पक्षांकडून कंपनी नेमणार

तीन दिवस पार पडलेल्या बैठकीत विदर्भ सोडून मुंबई–कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रातील जागांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तिढा असलेल्या जागांवर तीनही पक्षांकडून एखादी कंपनी नेमून पक्षाची ताकद जाणून घेतली जाणार आहे. पुढील बैठकीत विदर्भातील जागांवर चर्चा होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## मुंबईतील मोर्चाला हजारो कार्यकर्ते जाणार : फारूक शाब्दी

**सोलापूर/प्रतिनिधी**

मोहम्मद पैगंबर यांच्या बद्दल वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या रामगिरी महाराज यांच्या निषेधार्थ एमआयएम पक्षाच्या वतीने मुंबईत २३ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय आंदोलनाची हाक देण्यात आली आहे.



या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात एमआयएमचे शहराध्यक्ष फारुख शाब्दी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर सोमवारी होणाऱ्या मुंबईतील मोर्चाला सोलापुरातून हजारो कार्यकर्ते जाण्याचा निर्धार करण्यात आला. यानंतर शाब्दी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा मुंबईत होणार आहे. एमआयएम पक्षाच्या मोर्चानंतर राज्य सरकार रामगिरी महाराजांना निश्चित अटक करेल असा विश्वास व्यक्त करताना शाब्दी यांनी सोलापुरातील सर्वपक्षीय मुस्लिम नेत्यांना या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले.

## अक्कलकोट येथे वृद्ध महिलेचे घर फोडले

### रोख रकमेसह दीड लाखाचे दागिने गायब

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी मुलाकडे गेले असता चोरट्याने एका वृद्ध महिलेच्या बंद घराचे कुलूप तोडून कपाटातील रोख रकमेसह १ लाख ६० हजार रुपये किमतीचे दागिने पळविले. ही घरफोडी ६ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास अक्कलकोट परिसरातील खासबाग येथे घडली.



या संदर्भात ताराबाई उर्फ विजयालक्ष्मी भीमराव हांडे (रा.खासबाग अक्कलकोट) यांनी अक्कलकल उत्तर पोलीसात फिर्याद दाखल केली. त्या ६ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास घराला लावून मुलाकडे गेल्या होत्या. दरम्यान चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि कपाटातील रोख १ लाख रुपये तसेच १५ ग्राम सोन्याचे दागिने पळवले. अशा आशयाची फिर्याद त्यांनी नुकतीच पोलिसात दाखल केली. पुढील तपास हवालदार चिंचोळकर करीत आहेत.

### रुग्णाच्या रुममधून मंगळसूत्र चोरले

सोलापूर : स्पॅन हॉस्पिटलमध्ये सविता शिरगीरे या महिला बाळाला चेकअप करण्यासाठी घेवून गेल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या रूम मधून चोरट्याने ३० हजाराचे सोन्याचे मंणीमंगळसुत्र चोरून नेले.

या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी सविता पांडुरंग शिरगीरे (वय ३१, रा. उमरगा चि ता. तुळजापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## निराळे वस्तीत बंद घर फोडले

**सोलापूर :** निराळे वस्तीत राहणारे चंद्रकांत लक्ष्मणराव जावळे यांचे घरफोडून चोरट्यांनी रोख रक्कम व दोन ग्रॅम वजनाची सोन्याची कर्णफुले असा १६ हजाराचा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २१ सप्टेंबर रोजी घडली.चंद्रकांत लक्ष्मणराव जावळे व पत्नी कामानिमित्त बाहेर गेले होते. चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करत गल्ल्यातील रोकड व दोन ग्रॅम वजनाची सोन्याची कर्णफुले असा १६ हजाराचा ऐवज चोरून नेला.

## श्री शिवचरित्र हे व्यवस्थापन शास्त्राचे उत्तम उदाहरण

### गोविंददेव गिरिजी : शिवछत्रपतींचे व्यवस्थापन विषयावर इंग्रजीतून संवाद

**सोलापूर/प्रतिनिधी**



**सोलापूर : शिवछत्रपतींचे व्यवस्थापन विषयावर इंग्रजीतून संवाद साधताना गोविंद देव गिरिजी महाराज.**

स्वामी विवेकानंद यांनी म्हटल्याप्रमाणे रामायण आणि महाभारतातील सर्व चांगल्या गुणांचा समुच्चय छत्रपती श्री शिवरायांच्या ठायी होता. श्री शिवचरित्र हे व्यवस्थापन शास्त्राचे उत्तम उदाहरण आहे, असे प्रतिपादन श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र अयोध्याचे कोषाध्यक्ष प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ सोलापूरतर्फे माजी प्रांतपाल माजी प्राचार्य के. भोगीशयना स्मृती व्याख्यान रविवारी सकाळी शिवस्मारक सभागृहात झाले. यावेळी प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी 'छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे व्यवस्थापनाचे धडे' या विषयावर सोलापूरकरांना इंग्रजीतून मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष सुनील माहेश्वरी, सचिव ब्रिजकुमार गोयदानी उपस्थित होते. रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष सुनील माहेश्वरी यांनी स्वागत केले. माजी अध्यक्ष किशोर चंडक यांनी माजी प्राचार्य के. भोगीशयना यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. संदीप जव्हेरी यांनी परिचय करुन दिला. गोवर्धन चाटला यांनी सूत्रसंचालन तर सचिव ब्रिजकुमार गोयदानी यांनी आभार प्रदर्शन केले.

### महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्याकडे दुर्लक्ष झाले

आधुनिक काळात व्यवस्थापन शास्त्र लिहिणाऱ्यांनी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्याकडे दुर्लक्ष केले हे त्यांचे दुर्दैव आहे. श्री शिवछत्रपतींची आज्ञापत्र या ग्रंथातून त्यांच्या व्यवस्थापनाची चुणूक दिसून येते. ध्येय निश्चित करणे ही व्यवस्थापनाची पहिली पायरी आहे. त्यानुसार श्री शिवछत्रपतींनी स्वराज्य स्थापनेचे ध्येय वयाच्या १५ व्या वर्षी निश्चित केले आणि आपल्या अंगभूत व्यवस्थापन कौशल्याच्या जोरावर ते पूर्ण देखील केले.

### रेल्वेचे ४५ लाखांचे नुकसान

## सेवानिवृत्त लोको पायलटविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर/प्रतिनिधी**

ऑफिसचे गेटवर उभे राहून लोको पायलटला इच्छापूर्वक कर्तव्यावर जाण्यास अटकाव केल्याने भारतीय रेल्वेचे सुमारे ४५ लाख रुपयांहून अधिक रुपयांचे नुकसान झाले. हा खळबळजनक प्रकार येथील रेल्वे स्थानकात गुरुवारी घडला. याप्रकरणी सेवानिवृत्त लोको पायलटविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेवानिवृत्त लोको पायलट एस. जे. निगडे (रा. सोलापूर) यांनी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर थांबून लोको पायलटला धमकावून कर्तव्यास न जाण्यास प्रवृत्त केले. हा प्रकार बुधवारी दुपारी पासून सुरू झाला होता. त्यामुळे रेल्वेच्या १३ गाड्यांच्या वाहतुकीचा खोळंबा झाला. ज्यामुळे भारतीय रेल्वेचे ४५ लाखांचे आर्थिक नुकसान केले. याची फिर्याद रविंद्रनाथ प्रभुदास राय (वय- ४८) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार सेवानिवृत्त लोको पायलट एस. जे. निगडे (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलाय. पोलीस उपनिरीक्षक पाटील या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

## डॉ. वाघचवरे यांनी इटलीमध्ये रोवला भारताचा झेंडा

### फुल आयर्न मॅन होणारे सोलापूरचे पहिलेच सुपूत्र

**सोलापूर/प्रतिनिधी**

इटली देशातील सर्विया प्रांतात शनिवार २१ सप्टेंबर रोजी फुल डिस्टन्स आयर्न मॅन स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. सोलापूरचे सुपुत्र अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.अभिजित वाघचवरे यांनी ही अवघड स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली.

संपूर्ण जगात अंत्यत अवघड अशा समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेत जगभरातून तीन हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता तर भारतातून २० स्पर्धकांनी भाग घेतला होता. सोलापूरच अस्थिरोग तज्ञ डॉ .अभिजीत वाघचवरे यांनी फुल आयर्न मॅन हा खिताब मिळवला. असा खिताब मिळवणारे



सोलापूरचे पहिलेच सुपुत्र बनले आहेत. फुल आयर्न मॅन या स्पर्धेमध्ये समुद्रामध्ये चार किलोमीटर स्विमिंग, १८० किलोमीटर सायकलिंग तर ४२ किलोमीटर रनिंग असे तिन्ही क्रीडा प्रकार एकापाठोपाठ एक पूर्ण करावयाचे असतात . इटलीच्या या स्पर्धेमध्ये भूमध्य समुद्राच्या उसळत्या थंड पाण्याच्या लाटांचा सामना करीत त्यांनी त्यांचे चार किलोमीटरचे स्वीम दोन तास चार मिनिटात पूर्ण केले . तर १८० किलोमीटरचे सायकलिंग सात तास ४० मिनिटात त्यांनी पूर्ण केले. यावेळी त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ राजश्री वाघचवरे या सायकलिंग व रनिंग रूटवर साडे पंधरा तास त्यांचे मनोबल वाढवण्याकरता उपस्थित होत्या.

### व्यायामातले सातत्य खूप महत्त्वाचे : डॉ. वाघचवरे

आपली शारीरिक तंदुरुस्ती हीच खरी संपत्ती आहे ती संपत्ती टिकवण्याकरता व्यायामातले सातत्य खूप महत्त्वाचे आहे. अशा कठीण स्पर्धांमध्ये भाग घेऊन त्या पूर्ण करण्याकरता संपूर्ण कुटुंबाचा खूप मोठा आधार आपल्याला लागतो त्यामुळे आपले मनोबल वाढत राहते.

## अगोदर आजी- माजी आमदारांवर कारवाई करा : उमेश पाटील

**मोहोळ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिलेल्या इशाऱ्याला मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांना प्रत्युत्तर दिले आहे. माझ्यावर कारवाई करण्यापूर्वी माजी आ. राजन पाटील आणि आ. यशवंत माने यांच्यावर कारवाई करावी असे म्हटले आहे.

मोहोळ येथे राष्ट्रवादी काँग्रेसची जनसन्मान यात्रा आयोजित करण्यात आली होती. त्या कार्यक्रमात बोलताना सुनील तटकर यांनी पक्षाच्या विरोधात काम करणाऱ्यांना जागा दाखवून दिली जाईल, असा इशारा उमेश पाटील यांचे नाव न घेता दिला होता. त्यावर पाटील यांनी खुलासा केला आहे. उमेश पाटील म्हणाले, पक्षशिस्तीचा भंग करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निश्चित अधिकार आहे. मात्र माझी मागणी आहे की, कारवाई सिलेक्टिव्ह नसावी. राजन पाटील यांनी मोहोळचा राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार जाहीर कसा केला?ते ंपिक्षाची शिस्त न पाळता परस्पर उमेदवारी जाहीर करत असतील तर पहिली कारवाई ही राजन पाटील यांच्यावर झाली पाहिजे. यशवंत माने हे घड्याळाचे आमदार आहेत. पण ते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षांना घेऊन अजितदादांनी दिलेल्या निधीतून झालेल्या विकास कामांचे उदघाटन का करत आहेत? यासंदर्भात प्रांताध्यक्षांनी भूमिका मांडायला पाहिजे होती. त्यामुळे दोघांवरही कारवाई करावी असे म्हटले.

## सर्वच आरक्षण आर्थिक निकषावर हवे

### अमित ठाकरे यांचे प्रतिपादन

**सोलापूर/प्रतिनिधी**

मराठा आणि धनगर आरक्षणाचा प्रश्न चिघळत असतानाच मनसे नेते अमित ठाकरे यांनी सर्वच आरक्षण आर्थिक निकषावर हवे, असे म्हटले आहे. ठाकरे हे मंगळवेढा-पंढरपूर दौऱ्यावर रविवारी आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

अमित ठाकरे म्हणाले की, आरक्षणाबाबत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. जे गरीब आहेत त्यांना



आरक्षण मिळाले पाहिजे. मग तो मराठा असो की ओबीसी असो. श्रीमंतांना आरक्षणाची गरज नाही. त्यामुळे आर्थिक निकषावर आरक्षण द्यावे, अशी आमची मागणी आहे. निवडणुकीबाबत ठाकरे म्हणाले की, मला राज साहेब सांगतील त्या मतदारसंघातून मी लढणार आहे.

अजून मतदारसंघ फायनल झालेला नाही. त्यामुळे मी अमूक ठिकाणांहून लढणार अशा बातम्या चुकीच्या आहेत, असेही ते म्हणाले. तत्पूर्वी मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी पंढरपुरात अमित ठाकरे यांचे जंगी स्वागत केले.

# बलात्कार प्रकरणात सराफ व्यापाऱ्यास उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

✔ सोलापूर/प्रतिनिधी

एका महिलेस ऑर्केस्ट्रा बार मध्ये काम मिळवून देतो असे म्हणून तिला बार्शी रोड वरील एका लॉज मध्ये नेवून तिच्यावर बलात्कार केल्याप्रकरणात सराफ व्यापारी माणिक सुरेश नारायणपेठकर रा. उत्तर कसबा यांस मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती संदीप मारणे यांनी जामीनावर मुक्तता केली.

सराफ व्यापारी माणिक नारायणपेठकर यांची एका महिले बरोबर ओळख झाली होती. तिला ऑर्केस्ट्रा बार मध्ये कामास लावतो असे सांगुन माणिक नारायणपेठकर याने तिला दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी बार्शी रोडवरील लॉजवर बोलावून तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर त्या पिडीत महिलेने तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. यावरून माणिक नारायणपेठकर याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला. या प्रकरणात माणिक नारायपेठकर याला दि. ३० मे २०२४ रोजी पोलिसांनी अटक केली होती. या प्रकरणात सुरूवातीला तालुका पोलिसांनी तपास केला. त्यानंतर या प्रकरणात ॲट्रॉसिटी कायद्याच्या तरतुदी लागू झाल्याने गुन्हा पोलिस उपअधिक्षक संकेत देवळेकर यांच्याकडे तपासासाठी वर्ग झालेला होता. या प्रकरणात पोलिसांनी फिर्यादीच्या कथनाच्या अनुषंगाने स्पष्ट पुरावा आढळून न आल्याने, पोलिसांनी क्रि.प्रो.कलम १६९ प्रमाणे बंधमुक्त करण्याबाबत रिपोर्ट सादर केला होता. तसेच आरोपी विरूध्दची तक्रार सिध्द होत नाही, असा अंतिम ब फायनल रिपोर्टही पाठविला होता.

या प्रकरणात आरोपींने दुसऱ्यांदा जामिन अर्ज मांडल्यानंतर सोलापूर येथील विशेष न्यायाधीशांनी त्याचा जामिन अर्ज नामंजूर केला होता. त्यावर माणिक नारायणपेठकर यांनी त्यास मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्याठिकाणी मुंबई उच्च न्यायालयाने खालील कोर्टाचा जामिन नामंजूरीचा आदेश रद्द करून आरोपी माणिक नारायणपेठकर याचा जामिन करून त्याची २५ हजार रूपयाच्या जामिनावर मुक्त करण्याचा आदेश दिला. या मध्ये आरोपीच्या वतीने ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. प्रशांत नवगीरे, ॲड. गुरूदत्त बोरगांवकर, ॲड. देवदत्त बोरगांवकर, ॲड.रणजित चौधरी, ॲड.आशुतोष पुरवंत, ॲड, प्रणव उपाध्ये यांनी काम पाहिले. तर मुंबई उच्च न्यायालय येथे ॲड. शशि पुरवंत यांनी तर सरकारच्यावतीने ॲड. शिल्पा गाजरे-धुमाळ यांनी काम पाहिले.

# दोन्ही पोलीस स्टेशनच्या नवीन बांधकामास दहा कोटी

## आमदार कल्याणशेट्टी यांच्या सततच्या प्रयत्नाला आले यश

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी



अक्कलकोट शहरातील दोन्ही पोलीस स्टेशनच्या इमारती या संस्थानकालीन आहेत. त्या खूपच जीर्ण झाल्याने वाढत्या कार्यभाराला अनुरूप असे कामकाज करणे अडचणीचे ठरत होते. सर्वच शासकीय कार्यालयाच्या इमारती या सर्व सुख सोयीने सुसज्ज आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केलेला असावा यासाठी सतत पाठपुरावा करून दहा कोटी पेक्षा जास्त निधी मंजूर करून आणलेला आहे.

**– सचिन कल्याणशेट्टी, आमदार, अक्कलकोट.**

अक्कलकोट तालुक्यासाठी असलेल्या उत्तर आणि दक्षिण पोलीस स्टेशन यांच्या सध्या अस्तित्वात असलेल्या दोन्ही इमारती ह्या अतिशय जुनाट आणि जीर्ण झालेल्या असल्याने त्या दोन्हींच्या एकत्रित नवीन बांधकामाच्या १० कोटी ३४ लाख रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे. परिणामी कित्येक वर्ष प्रतीक्षेत असलेला हा प्रश्न निकाली निघाला आहे अशी माहिती आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.

अक्कलकोट तालुका हा सतत नेहमी वर्दळीचा आणि संवेदनशील तालुका असल्याने या ठिकाणी पोलिसांचा कार्यभार मोठा आहे. यासाठी अत्याधुनिक आणि सुसज्ज असे नवीन इमारत फर्निचरसह असणे अत्यंत आवश्यक होते.

नेमकी हीच गरजेची बाब ओळखून आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी गृह विभाग आणि पोलीस कल्याण विभाग यांच्याकडे सतत पाठपुरावा करून १०.३४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणल्याने हा प्रश्न निकाली निघाला आहे. थोड्याच दिवसात सुधारित अंदाजपत्रक आणि निविदाची प्रक्रिया पूर्ण करून इमारत बांधकामात सुरू होणार आहे. अक्कलकोट शहर आणि तालुक्यातील सुमारे १४० च्या आसपास असलेले सर्व गावे या ठिकाणी असणाऱ्या पोलीस प्रशासनावर असणाऱ्या कामाचा ताण कमी होऊन त्यांना अधिक चांगल्या प्रकारे काम करणे सोपे जावे यासाठी सदर इमारतीच्या बांधकामास निधीची मंजुरी मिळणे आवश्यक होते तो प्रश्न आता पूर्णत्वास जात आहे.

नव्याने बांधकाम निधी मंजूर झालेल्या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये अशी आहेत महाराष्ट्र शासनाचा गृह विभाग आणि महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ मुंबई यांच्यामार्फत दोन्ही पोलीस स्टेशनच्या एकत्रित बांधकामासाठी फर्निचरसह १०.३४ कोटी निधी मंजूर झाला आहे.

ज्यात तळमजला आणि वर दोन मजले अशी भव्य दिव्य तीन मजली इमारत बांधली जाणार आहे. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या २८४०० चौरस फूट जागेपैकी १८०९० चौरस फूट जागेत बांधकाम होणार आहे.सदर प्रकल्पाची निविदा अंतिम करून काम सुरु होणे बाकी आहे.

# अनगर अप्पर तहसील रद्दसाठी आणखी एक जनहित याचिका दाखल

✔ **मोहोळ** : अनगर अप्पर तहसील रद्द करण्यासाठी समितीच्या वतीने हायकोर्टात ८ जणांनी मिळून आणखी एक जनहित याचिका ही ॲड. धनंजय चव्हाण (मुंबई) यांच्या मार्फत दाखल केली असल्याची माहिती सोमेश क्षीरसागर यांनी दिली.

मोहोळ तालुक्याचे विभाजन होऊन अनगर येथे नव्यानेच अपर तहसील कार्यालय मंजूर केल्याचा आदेश राज्य शासनाकडून पारित झालेला आहे.याला विरोध करण्यासाठी मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीची स्थापना झाली आहे. समिती ने या पूर्वी ही न्यायालयीन लढा लढण्यासाठी ॲड. अनंत वडगावकर बार असोसिएशन मोहोळ यांच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल केली आहे . आता ही दुसरी जनहित याचिका सोमेश क्षीरसागर, उमेश पाटील, विजयराज डोंगरे, मानाजी माने, सरपंच यशवंत मोटे, बालाजी खुर्द, विक्रांत दळवी, मनोज मुळे या आठ जणांनी दाखल केली आहे. यामुळे यावर निर्णय काय होणार याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. याच्या आधी संतोष पाटील नरखेडकर यांनीही एक जनहित याचिका दाखल केले आहे. त्यांची मंगळवारी मुख्य न्यायाधीशांच्या देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या समोर सुनावणीस येईल असेही सोमेश आबा यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांच्या स्थगितीला अर्थ नाही का?

संघर्ष समितीचे सोमेश क्षीरसागर म्हणाले की, कायदेशीरदृष्ट्या व लोकांच्या सोयीच्यादृष्ट्या शासनाने घेतलेला हा निर्णय अत्यंत चुकीचा आहे.त्याच बरोबर एखाद्या राज्याचा संविधानिक प्रमुखाने एखाद्या निर्णयाला स्थगिती दिली तर त्या स्थगिती निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित महसूल विभागाची असते. ती अद्याप का झालेली नाही. म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या स्थगितीला काहीच अर्थ नाही का?, मुख्यमंत्री हे राज्याचे संविधानिक प्रमुख असतात.त्यांचा हा अपमानच आहे. या सर्व बाबी दाखल केलेल्या याचिकेत नोंदविल्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त




अक्कलकोट : आरोग्य शिबीरात सहभागी डॉक्टरवर्ग तसेच अन्य सेवक व नागरिक.

### अक्कलकोट येथे स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत आरोग्य शिबिर

✔ **अक्कलकोट** : अक्कलकोट नगरपरिषदेकडील सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी मुख्याधिकारी रमाकांत डाके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्या सूचनेनुसार व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, येथे डॉ. स्वप्निल हिप्परगी व डॉ. ज्ञानेश्वर वाघमारे यांच्या उपस्थितीत आरोग्य शिबिर राबविण्यात आले. यावेळी अधिपरिचारिका, आरोग्य सेवक व लॅब टेक्निशियन उपस्थित होते. वेळापत्रकानुसार-उच्च रक्तदाब, मधुमेह, सीबीसी, बीएसएल, टीएसएच, कर्करोग व इतर असंसर्गजन्य आजाराची तपासणी करण्यात आली.




उत्तर सोलापूर : आमदार यशवंत माने यांच्या हस्ते आरास स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वाटप करण्यात आले.

### मार्डी येथे गौरी गणपती आरास स्पर्धेचे बक्षीस वितरण

✔ **उत्तर सोलापूर** : उत्तर तालुक्यातील मार्डी येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सोलापूर गौरी गणपती आरास स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ व महिला मेळावा आमदार यशवंत माने यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी सुनील भोसले, अश्विनी हॉस्पिटलच्या डॉ. रायते, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे निरीक्षिका-दिपाली पांढरे,माजी जिल्हा परिषद सदस्या - ज्योती मार्तंडे, जिल्हाध्यक्षा-वर्षाराणी शिंदे, माजी सभापती-सुरेखा पाटील, कार्याध्यक्षा-उज्ज्वला पाटील, सोलापूर शहर अध्यक्षा-संगीता जोगधनकर, कार्याध्यक्षा-चित्रा कदम, समन्वयक-शशिकला कसपटे, शिवाजी वाघमारे, मंगलाबाई सोनार, सुरेखा घाडगे, राणी डोंगरेसह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

### मुख्यमंत्री वयोश्री, तीर्थ दर्शन योजनांचा लाभ घ्यावा : गवळी

✔ **सांगोला** : सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची/दर्शनाची संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरू करण्यात आली आहे. ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाय योजना करण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यात येत आहे. सांगोला शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. सुधीर गवळी यांनी केले आहे. सांगोला नगरपरिषदेमार्फत अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली असून नगरपरिषद कार्यालयातून अर्ज प्राप्त करावेत. अधिक माहितीसाठी सांगोला नगरपरिषदेच्या कर निरीक्षक रोहित गाडे व सचिन पाडे यांच्याशी संपर्क साधावा, असे सांगितले आहे.



### कलावती सोनार यांचे निधन

✔ **मार्डी** : (ता. उत्तर सोलापूर) येथील कलावती सिद्राम सोनार (वय ६५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन विवाहित मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.




नातेपुते : वृक्षारोपण प्रसंगी उपस्थित नातेपुते ग्रामपंचायतीमधील पदाधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ.

# नातेपुते नगरपंचायतच्यावतीने विविध उपकमासह वृक्षारोपण

✔ नातेपुते/प्रतिनिधी

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत 'स्वच्छता हीच सेवा पंधरवडा' १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर दरम्यान राबविण्यात येत आहे. यानिमित्ताने वृक्षारोपणासह विविध उपक्रम नातेपुते नगरपंचायतीच्यावतीने घेण्यात येत आहेत.

उपक्रमांमध्ये स्वच्छता मोहीम, सफाई कर्मचाऱ्यांना आरोग्य विमा, विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा तसेच 'एक पेड मां के नाम' अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. शनिवारी (दि. २१) विठ्ठल मंदिर परिसरामध्ये नगरपंचायतीच्यावतीने नारळ, आंबा, चिकू, सिताफळ आदी झाडे लावली.

यावेळी नातेपुते नगरपंचायतीचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, नगराध्यक्षा अनिता लांडगे, उपनगराध्यक्ष अतुल पाटील, नंदुकुमार लांडगे, अशोक जावरे, प्रदिप वनसाळे, अभिजीत महामुनी तसेच नगरपंचायतीचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

वृक्ष आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्याबरोबरच कार्बन डायऑक्साइडसारखे विषारी वायू शोषून घेऊन आपणास प्राणवायू देतात. दुहेरी भूमिका पार पडणाऱ्या या वृक्षामध्ये प्रदूषण कमी करण्याची अद्भुत क्षमता असते.

**– माधव खांडेकर,** मुख्याधिकारी, नातेपुते नगरपंचायत.

# रिपाइं वर्धापनदिनास माळशिरसमधून शेकडो कार्यकर्ते जाणार

✔ वेळापूर/प्रतिनिधी



वेळापूर : माळशिरस येथे रिपाइं आठवले पक्षाची बैठक झाली.

सातारा येथे दि. ३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या रिपाइंच्या ६७ व्या वर्धापनदिनास माळशिरा तालुक्यात शेकडोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. त्यासाठी पूर्वतयारीची महत्त्वपूर्ण बैठक माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली माळशिरस येथील शासकीय विश्रामगृहात झाली.

बैठकीत सातारा येथे माळशिरस तालुक्यातून शेकडो कार्यकर्ते घेऊन जाण्याचे सर्वांनुमते ठरले. गाव भेट दौरा अभियानांतर्गत गाव तिथे शाखा, घर तेथे रिपब्लिक कार्यकर्ता अभियान राबवणे, आगामी विधानसभा निवडणूक इ. विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष एन. के. साळवे, युवक राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, जिल्हा उपाध्यक्ष शाम भोसले, जिल्हा उपाध्यक्ष एस. एम. गायकवाड, जिल्हा सचिव रमेश धाईंजे, ज्येष्ठ नेते आबासाहेब बनसोडे, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, सरचिटणीस मारुती खांडेकर, कोषाध्यक्ष समीर सोरटे, संघटन सचिव पोपट गेजगे, युवक सरचिटणीस प्रविण साळवे, युवा कार्याध्यक्ष विनोद रणदिवे, अण्णासो भोसले, प्रकाश गायकवाड, संतोष कांबळे, सुनील ओवाळ, दादा सरतापे, रामहरी नवगिरे, दिलीप सरतापे, दिलीप भोसले, मारुती शिंदे, गणेश सावंत, विश्वजीत भालशंकर, संतोष बनसोडे, प्रकाश कांबळे, गौतम लोंढे, रवींद्र झेंडे, पंकज भोसले, अभिजीत वाघमारे, स्वप्निल सरवदे, संघर्ष सोरटे, निखल सरवदे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक विनोद रणदिवे, स्वागत समीर सोरटे यांनी केले. आभार सुनील ओवाळ यांनी मानले.

# केंद्रीय मंत्री गडकरी यांचा गहिनीनाथ महाराजांकडून सत्कार

✔ पंढरपूर/प्रतिनिधी



पंढरपूर : गडकरी यांचा सत्कार करताना गहिनीनाथ महाराज.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गाच्या सहाव्या टप्प्याच्या चौपदरीकरण कामाचा पुण्यातील भूमीपूजन समारंभात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरच्यावतीने सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

वारकरी पगडी, विणा, चिपळ्या, श्रींची मूर्ती व शेला असे सन्मानाचे स्वरुप होते. याप्रसंगी मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

पंढरीच्या वारीला शेकडो वर्षांची अध्यात्मिक परंपरा आहे. संतांच्या पालखीमार्गाच्या विस्तृतीकरणाने वैष्णवांच्या मांदियाळीची मोठी सेवा आपण शासनाला घडविलीत, असे गडकरीं याना दिलेल्या कृतज्ञता पत्रात म्हटले आहे.

कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री दिलीप वळसे-पाटील, मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. त्यांचा देखील मंदिर समितीच्यावतीने सन्मान करण्यात आला.

गहिनीनाथ महाराज औसेकर आणि आळंदी आणि देहू संस्थानांच्या प्रमुख विश्वस्तांचा देखील नितीन गडकरी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# पंतप्रधानांच्या हस्ते कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाइन उद्घाटन

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग यांच्या 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रा' च्या अनुषंगाने वर्ध्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध विकास कार्यांचे उदघाटन केले. या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचा आनंद स्वेरीतील विद्यार्थ्यांनी घेतला.

पंतप्रधान मोदी यांनी शिक्षण विषयक नवीन योजना, समृद्धीपूरक उपक्रम व धोरणासंबंधी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी.मिसाळ आणि पदवी अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीच्या अभियांत्रिकी (पदवी व पदविका) महाविद्यालयात या थेट प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे देखील उपस्थित होते. दूरदृष्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन केले होते.

योजनेद्वारे स्वेरीच्या डिप्लोमा इंजिनिअरिंगमध्ये सिव्हील सर्वे अर आणि ड्रॉप्समन मेकॅनिकल या दोन ट्रेनिंग प्रोग्रामला मान्यता मिळाली आहे. तर डिग्री इंजिनिअरिंगमध्ये सर्वेअर आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग प्रोडक्ट डेव्हलपमेंट या दोन ट्रेनिंग प्रोग्रामला मान्यता मिळाली आहे.

या चारही अभ्यासक्रमांसाठी प्रवेश क्षमता प्रत्येकी ३० विद्यार्थी एवढी आहे. विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण मोफत स्वरुपात मिळणार आहे. थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डिप्लोमा इंजिनिअरिंगमध्ये प्रा. व्ही. एस. स्वामी, प्रा. अमेय भातलवंडे, डिग्री इंजिनिअरिंगमधील प्रा. ए. ए. मोटे, प्रा. एस. ए. इनामदार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पावसाळ्यात भाजीपाल्यांचे दर गगनाला – मागणी जास्त व पुरवठा कमी झाल्याचा परिणाम

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

अक्कलकोट शहर तालुक्यात ऐन पावसाळ्यात पावसाच्या हुलकावणींने भाजीपाला दरात प्रचंड वाढ झाली आहे. मागणी जास्त व पुरवठा कमी यामुळे दर गगनाला भिडले आहेत.

अक्कलकोट शहरात किरकोळ बाजारात मेथी, शेपू २० रूपये प्रती जुडी, कोंथींबीर ३० रूपये प्रती जुडी, पालक, चुका २० रूपये, कांदे ६० ते ८० रूपये किलो दराने विक्री केले जात आहे. वाढत्या महागाईमुळे सामान्य जनता मेटाकुटीला आली आहे.

वास्तविक पाहता श्रावण महिन्यापासून भाजीपाल्याची प्रचंड आवक होत असून गरीबांसाठी भाजीपाला खाण्याची ही संधी असते. पण ऐन पावसाळ्यातच भाजीपाल्याचे दर वाढले आहेत. २० रूपये प्रति किलो दराने मिळणाऱ्या बटाट्याने कधींच अर्धशतकी आकडा गाठला आहे.

लसूण तर जेवणातून वाढत्या दरामुळे हद्दपारच झाला आहे. अशीच जर पावसाने हुलकावणी दिली तर भाजीपाल्याचे दर अजूनही वाढण्याची शक्यता असल्याचे सामान्य नागरिकांतून बोलले जात आहे.



भाजीपाल्यांचे दर वाढल्याने दाळ वापरावी लागत आहे. एवढीशी छोटी जुडी २० ते ३० रूपयाला मिळत आहे. कोथिंबीर तर बघायला पण मिळत नाही. पालक घ्यायचे तर चुका घ्यायची सक्ती करतात.

**- अश्विनी पाटील, गृहिणी, अक्कलकोट.**

भाजीपाल्याची आवक कमी झाल्याने दर वाढले आहेत. अशीच जर स्थिती राहिली तर दर अजूनही वाढण्याची शक्यता आहे.

**-नूर बागवान, व्यापारी, अक्कलकोट.**



**(संग्रहित छायाचित्र.)**



पंढरपूर : धनगर समाजाच्या उपोषण स्थळी जाऊन पाठिंब्याचे पत्र देताना आ. शहाजीबापू पाटील.

# मुख्यमंत्र्यांना भेटून प्रश्न मार्गी लावणार : आ. शहाजी पाटील

धनगड दाखले रद्दचा निर्णय घ्या, अन्यथा पाणीही बंद : उपोषणकर्ते

पंढरपूर/प्रतिनिधी

मागील ७० वर्षापासून प्रलंबित असणारा धनगर समाजाचा एसटी आरक्षण अंमलबजावणीचा प्रश्न उद्याच सुटावा व आमरण उपोषण स्थगित व्हावे यासाठी धनगर समाजाचा वकील म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून तात्काळ निर्णय घ्यावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आ.शहाजी बापू पाटील यांनी सांगितले.

उपोषणस्थळी आ. पाटील यांनी भेट दिली. उपोषण करणाऱ्या सहा तरुणांना भेटून प्रकृतीची चौकशी केली. तसेच पाठिंबा पत्र दिले. यावेळी ते बोलत होते. स्वातंत्र्यापासून हा प्रलंबित पडला आहे परंतु राज्याचे मुख्यमंत्री हे संवेदनशील असून त्यांनी संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील खिल्लारे कुटुंबाचे जे खाडाखोड करून मिळविलेले 'धनगड' नावाचे दाखले रद्द करण्याचा निर्णय घेणार असल्याचे सांगितले आहे. तो रद्दचा आदेश तात्काळ व्हावा व मागील अनेक वर्षापासूनचा प्रश्न सुटावा यासाठी मी उद्या मुख्यमंत्र्यांना भेटून निश्चित मार्ग काढणार असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.

### उशिरा भेट दिल्याबद्दल दिलगिरी

मागील काही दिवसापासून मी आजारी असून दवाखान्यात ॲडमिट होतो.परंतु माझे लक्ष उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीकडे सतत होते. मी प्रसार माध्यमाच्या माध्यमातून ते पाहत होतो. कार्यकर्त्यांकडे चौकशी करीत होतो. त्यामुळे आंदोलन स्थळी येण्यास मला उशीर झाला, त्याबद्दल मी समाजाची माफी मागतो, असे आ. पाटील म्हणाले.

# महायुतीचे सरकार हे शेतकऱ्यांचे सरकार

## माढ्यातील सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

माढा/प्रतिनिधी

बळीराजा खुश तर राज्य खूष याप्रमाणे आम्ही कांदा निर्यात बंदी केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्याकडून उठवली. महायुती सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी अनेक चांगल्या योजना राबवित आहोत. त्यामुळे महायुतीचे सरकार हे शेतकऱ्यांचे सरकार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



जनसन्मान यात्रेनिमित्त अजित पवार रविवारी टेंभुर्णीत आयोजित सभेत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणक, आ. बबनराव शिंदे, आ. संजय शिंदे, वसंतराव काळे कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, बाजार समितीचे उपसभापती सुहास पाटील, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह शिंदे, लतीफ तांबोळी, बंडू ढवळे, शिवाजी पाटील, वामन उबाळे, वर्षाराणी शिंदे आदी उपस्थिती होते.

अजित पवार यांनी आमदार बबनराव शिंदे यांच्या माध्यमातून माढा मतदारसंघासाठी करोडो रुपयांचा निधी दिला आहे. संत सावतामाळी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अरणला अ वर्ग



माढा : मेळाव्याला उपस्थित जमलेल्या महिला भगिनी.

दर्जा दिल्याने भरीव निधी उपलब्ध होणार आहे. लवकरच या ठिकाणी वास्तुशिल्प आणि भक्तनिवास साकार होईल असे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच सोलापूर विमानतळाचे उद् घाटन होणार असून सोलापूरचा मुंबई-दिल्ली सोबत आणि वेगवान प्रवास उद्योगधंदे वाढवण्यासाठी उपयोगी ठरणार आहे, असेही पवार म्हणाले. लोकसभेला विरोधकांचे ऐकलात पण आता ऐकू नका एक वर्षानंतर रात्रीची वीज बंद करणार असून निवडणुकीमध्ये महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

यावेळी माढा मतदारसंघातील जनतेने कामाचा आमदार म्हणून ओळख असलेल्या आमदार बबनराव यांची साथ कुठल्याही परिस्थितीत सोडायची नाही, असे आवाहनही त्यांनी केले. आ. बबनराव शिंदे यांनी माढा मतदारसंघाच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी बार्शी उपसा सिंचन योजना खैराव मानेगाव सिंचन योजना यासारखे अनेक योजनांना मंजुरी दिली. गेल्या दोन वर्षात साडेपाचशे कोटी रुपयांची कामे माढा तालुक्यात मंजूर केली. तालुक्यामध्ये मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना अंतर्गत ६५ हजार महिलांना तीन हजार रुपये प्रमाणे पैसे जमा झाल्याचे सांगितले.

# महिलांना वर्षात तीन गॅस सिलिंडर मोफत

### मोहोळमध्ये उपमुख्यमंत्री पवार यांची माहिती

मोहोळ/प्रतिनिधी

जनसन्मान यात्रेनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार रविवारी (दि.२२) मोहोळमध्ये आले होते. आ. यशवंत माने आणि माजी आ. राजन पाटील यांच्या नेतृत्वात जाहीर सभा झाली. यावेळी त्यांनी महिलांना वर्षाला ३ गॅस सिलिंडर मोफत देणार असल्याची मोठी घोषणा केली. गरीबांच्या मुली शिकाव्यात यासाठी दीड हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राज्याचे स्थूल उत्पन्न ४२ लाख कोटी आहे. अर्थसंकल्प साडेसहा लाख कोटींचा सादर केला होता, त्यामुळे या पैशातून महिला, आदिवासी, म ागासवर्गीय यांच्यासाठी योजना येत असतात, असे अजित पवार म्हणाले.

### बहीण आणि भाऊ दोघेही लाडके

आम्हाला बहीण आणि भाऊ दोघेही लाडके आहेत. वारकरी, ज्येष्ठ नागरिक, मुस्लिम, मातंग सर्वांसाठीही योजना आहेत. मराठा, ओबीसी, आदिवासी या सर्वांच्या महामंडळाला पैसे दिले आहेत. लोकसभेला आम च्याकडे पाठ फिरवूनही, मुस्लिम समाजासाठी योजना आणून १ हजार कोटी दिले असून कर्जाची हमी सरकारने घेतल्याचे अजित पवार म्हणाले.

**विरोधकांना केवळ टीका करण्याचेच काम**

पाणी उपसण्याची योजना सोलरवर घेत असल्यामुळे शेतकऱ्यांवर लाईट बिल भरण्याचा बोजा येणार नाही. त्यासाठी बजेटमध्ये तरतुद करणार आहे. हे वीज बिल सोलर पॅनलमध्ये घेवून शेतकऱ्यांना फक्त पाणीपट्टी भरावी लागेल. सध्या साडेनऊ हजार मीटर मेगा वॅट वीज सोलर वर बनवत आहे. केवळ एक वर्ष कळ काढा, पुढील वर्षीपासून सर्व शेतकऱ्यांना दिवसादेखील शेतीला वीज मिळू शकेल असे अजित पवार म्हणाले. विरोधक केवळ आमच्यावर टीका करत आहेत. ते दुसरं काही करु शकत नाहीत, असा टोलाही त्यांनी विरोधकांना हाणला.

## युनियन बँकेतर्फे राष्ट्रीय लोक अदालत

सोलापूर : येथील युनियन बँक ऑफ इंडियाच्या जोडभावी पेठ शाखेच्या वतीने शनिवार, २८ रोजी थकीत कर्जाचा निपटारा करण्यासाठी राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम सकाळी ११ ते सायंकाळी ५ या कालावधीत होणार आहे.



मंगळवेढा : येथे आरक्षण मिळावे यासाठी सकल धनगर समाजाच्या वतीने आमदार समाधान आवताडे यांना निवेदन देताना.

## धनगर समाजाचे आ. आवताडेंना निवेदन

मंगळवेढा : सकल धनगर बांधवांना आरक्षण धनगर समाजाचा अनुसूचित जाती-जमाती एस् टी प्रवर्गात समाविष्ट व्हावा व त्याची त्वरित अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी सकल धनगर समाज बांधवांनी मंगळवेढा येथे आमदार समाधान आवताडे यांना निवेदन दिले.

आमदार आवताडे यांनी निवेदन स्वीकारून त्यांच्या मागण्याच्या अनुषंगाने पाठिंब्याचे लिखित स्वरूपात त्यांना पत्र दिले. यावेळी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, माजी उपसभापती सूर्यकांत ढोणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जगन्नाथ रेवे, शिवाजी सरगर, पडोळकर, दत्तात्रय माने, विठ्ठल सरगर, परमेश्वर मासाळ, रविकिरण कोळेकर यांच्यसह धनगर बांधव उपस्थित होते.

## आशा लोंढे हिची पोलीस दलात निवड



श्रीपूर : श्रीपूर येथील ब्रिमा सागर महाराष्ट्र डिस्टलरीज लिमिटेड्चे सुरक्षा विभागातील कर्मचारी रमेश लोंढे यांची कन्या आशा हिची पुणे सिटी पोलिस दलात पोलीस शिपाई म्हणून निवड झाली आहे.

तिने प्राथमिक शिक्षण श्री चंद्रशेखर विद्यालयात घेतले. त्यानंतर पदवीधर शिक्षण घेऊन अकलूज येथील अकॅडमीत प्रशिक्षण घेतले. पोलीस दलात तिच्या निवडीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या करमाळा तालुक्यात

करमाळा/प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार मंगळवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता करमाळा तालुक्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यात ते तालुक्यातील विकास कामांचे भूमिपूजन, महिला व शेतकरी मेळाव्याला संबोधित करतील. राधेश्याम मंगल कार्यालय येथे मेळावा होणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष भरत अवताडे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा येथे हेलिकॉप्टरने आगमन होईल. त्यानंतर क्कमलाभवानी देवीचे दर्शन, महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ते झरे फाटा येथील नियोजित मेळाव्यासाठी जातील.जाताना सुभाष चौक, देवळाली येथे त्यांचे स्वागत होईल. झरे फाटा येथे सावडी जिल्हा हद्द ते वेणेगाव या ७१ किलोमीटर व २७१.५५ कोटी निधी मंजूर असलेल्या रस्त्याचे भूमिपूजन पवार यांच्या हस्ते होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री चंद्रकांत पाटील असतील. प्रमुख उपस्थितीमध्ये आ. बबनराव शिंदे, आ. संजय शिंदे व माजी आ. जयवंत जगताप हे असतील.झरे फाटा येथील कार्यक्रमात लाडकी बहीण व शेतकरी मेळाच्याला उपमुख्यमंत्री पवार मार्गदर्शन करतील. त्यानंतर महायुतीतील घटक पक्षाची बैठक त्यांच्या उपस्थितीमध्ये होईल आणि त्यानंतर दौऱ्याची सांगता होईल. दौऱ्यासाठी देवीचा माळ येथून बाईक रॅलीचे आयोजन केल्याचे अवताडे यांनी सांगितले.

## ग्रामसेवक संघटनेतर्फे सीईओ जंगम यांचा सत्कार

उत्तर सोलापूर/प्रतिनिधी

१७ वर्षांपासून प्रलंबित असलेला पुरस्कारप्राप्त १०५ ग्रामसेवकांच्या वेतनवाढीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी मान्यता दिलली. त्याबद्दल ग्रामसेवक संघटनेतर्फे जंगम यांचा सत्कार करण्यात आला.

**पुरस्कारप्राप्त ग्रामसेवकाचा वेतनवाढीचा निर्णय**

सन २००७-०८ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षात जिल्हास्तरीय पुरस्कार मिळालेल्या ग्रामसेवकांना आगाऊ वेतनवाढीचा लाभ मिळणार आहे. १७ वर्षांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेमध्ये अनेक मुख्य कार्यकारी अधिकारी आले आणि गेले. आतापर्यंत १०५ ग्रामसेवकांना जिल्हास्तरीय पुरस्कार देऊन सत्कार केला. परंतु सरकारच्या निर्णयानुसार त्या सत्कारासोबत त्यांना एक वेतन वाढ देण्याचा निर्णयच घेतला नाही. आगाऊ वेतन वाढीचा सकारात्मक निर्णय घेतला नसल्याने पुरस्कारप्राप्त १०५ ग्रामसेवकांच्या पदरी निराशाच होत होती. ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्याकडून आलेल्या या फायलींवर सकारात्मक निर्णय घेत मुख्य कार्यकारी कुलदीप जंगम यांनी प्रश्न मार्गी लावल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे, ग्रामसेवक संजय राठोड, विलास माने, कुशाबा इंगळे, खंदारे, बारवे, साठे उपस्थित होते.

# शेगांव येथे शिक्षकांअभावी शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा

आज आंदोलन; विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

अक्कलकोट/प्रतिनिधी

शेगांव (ता.अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी व कन्नड शाळेत शिक्षकांची संख्या अपुरी असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षक न मिळाल्यास सोमवारी दि.२३ सप्टेंबर रोजी शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

याबाबत अक्कलकोट पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन दिले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचा पटसंख्या ही ८९ असून, मंजूर पदे ५ आहेत. शाळेत कार्यरत ३ पदे आहेत. मागील तीन वर्षांपासून हीच अवस्था आहे. इयत्ता १ ली ते ५ वी पट ही ७२ आहे. ६ वी ७ वी चा पट १७ आहेत. तसेच प्राथमिक कन्नड शाळेचा पट ७० असून, मंजूर पदे ४ आहेत. मागील तीन वर्षांपासून २ शिक्षक कार्यरत आहेत. कन्नड प्राथमिक शाळेसाठी १ ली ते ५ वी ५१ पट तर ६ वी ते ७ वी १९ पट संख्या आहे. या शाळा सीमावर्ती भागात असून, शिक्षक नसल्याने अनेक कन्नड माध्यमांतील मुले शेजारच्या विजयपूर जिल्ह्यातील कन्नड शाळेत प्रवेश घेतले आहेत. दोन दिवसांत विद्यार्थ्यांना शिक्षक उपलब्ध न झाल्यास सरपंच व उपसरपंच व ग्रामस्थांनी शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा दिला आहे.

### शिक्षक उपलब्ध झाल्यास त्वरित देणार

३० ऑगस्ट रोजी जि.प.प्राथमिक शाळा हनुमाननगर या कमी पटाच्या शाळेवरील बाबुराव कमलकार नडगिरी यांचे तात्पुरत्या स्वरुपात जि.प.प्रा.शेगांव या शाळेवर तात्पुरत्या समायोजन केले आहे आहे. परंतू अद्यापर्यंत नगडगिरे हे शिक्षक शाळेवर हजर झाले नाहीत. तसेच मराठी शाळेसाठी तात्पुरत्या स्वरुपात शिक्षक अत्यंत कमी पट असलेल्या शाळा उपलब्ध नसल्याने संबंधित शाळेवर शिक्षक देता आले नाही. जिल्हास्तरावरुन पवित्र पोर्टल किंवा आंतरजिल्हा बदलीने शिक्षक उपलब्ध झाल्यास प्रथम प्राधान्याने संबंधित शाळेवर शिक्षक देण्याची मागणी गटशिक्षणाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे.

# जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी जिल्ह्यात विविध ठिकाणी बंद; संमिश्र प्रतिसाद

सोलापूर/प्रतिनिधी

**मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू आहे. त्यांच्या समर्थनार्थ मराठा समाजातील विविध संघटनांकडून रविवारी जिल्ह्यात ठिकठिकाणी बंद, उपोषण आदी आंदोलने करण्यात आली.**


## करमाळ्यात कडकडीत बंद; बाईक रॅली काढून तहसीलदारांना निवेदन

करमाळा : उपोषणाच्या समर्थनार्थ मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज करमाळा तालुका यांच्यावतीने रविवारी पुकारण्यात आलेल्या बंदला करमाळाकरांनी आपली दुकाने बंद ठेवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बंद दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सकाळी दहा वाजता मराठा समाजासह बहुजन समाजतील अनेक युवकांनी बाईक रॅली काढून तहसील कार्यालयात निवेदन दिले. शहरातील सकल मुस्लिम समाज तसेच जैन संघटना, करमाळा यांनीही बंदला पाठिंबा दर्शवत बाईक रॅलीत सक्रिय सहभाग नोंदवला. तालुक्यातील जेऊर, शेटफळ, वरकटणे, केडगाव आदी ठिकाणीही व्यवहार बंद ठेवून बंद पाळण्यात आला.

### चमको नेत्याचा अपमान

मराठा आरक्षणाच्या कोणत्याही आंदोलनासाठी करमाळ्यातील राजकीय पुढारी म्हणवणारांनी केवळ मराठा समाज बांधव म्हणून उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मराठा समाजाकडून पूर्वीच केले आहे. मात्र रविवारी झालेल्या बाईक रॅली दरम्यान अशाच एका पुढाऱ्यांची चमकोगिरी इतरांना खटकली. महापुरुषांच्या पुतळ्याला हार घालताना या व्यक्तीला सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या अपमानाला सामोरे जावे लागले.



करमाळा : व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवल्यामुळे शुकशुकाट होता.

## कुर्डूवाडीत सर्व दुकाने बंद

कुर्डुवाडी : मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणास समर्थन देण्यासाठी सोमवारी (दि.२३) माढा तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने कुर्डूवाडी शहर, भोसरी कुर्डू गाव बंदची हाक दिली आहे.

मराठा समाज बांधव सोमवारी दुपारी ११ वाजता कुर्डूवाडी येथील प्रांत अधिकारी यांना निवेदन देणार आहेत. तरी समाज बांधवांनी व शहरातील नागरिकांनी व्यवसाय, दुकाने बंद ठेवून पाठिंबा देण्याचे आवाहन सकल मराठा समाजाचे समन्वयक संजय दादा टोणपे यांनी आवाहन केले आहे.

### पंढरपूर चौकात धनगर समाजाचा रास्ता रोको

कुर्डूवाडी व माढा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने धनगर जमातीला अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र वितरित करण्याच्या आदेशाबाबत शासननिर्णय काढण्याच्या अनुषंगाने सोमवारी (दि.२३) रोजी सकाळी ११ वाजता कुर्डूवाडी बाह्यवळण पंढरपूर चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन पोलिस निरीक्षकांना देण्यात आले.



परंडा : येथील युवकाने आजपासून उपोषणाला सुरुवात केली.

## परंडा येथे उपोषण सुरू; ज्ञानेश्वर पाटील यांचा पाठिंबा

परंडा : मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून परंडा तालुक्यातील नालगाव येथील राजकुमार गायकवाड या तरुणाने परंडा तहसील कार्यालयासमोर शनिवार (दि.२१) पासून प्राणांतिक उपोषण सुरु केले आहे.




उपोषण स्थळी माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांनी भेट देत पाठिंबा दिला. यावेळी राजकुमार जैन, धनंजय हांडे, रविंद्र मोरे, नाना मोरजकर, खंडू मोरे आदींसह परंडा तालुका सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते

## मंगळवेढ्यात साखळी आंदोलन

मंगळवेढा : मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मंगळवेढ्यात साखळी आंदोलनास सुरुवात करण्यात आली आहे.

यापुढे आंदोलन तीव्र करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी सकल मराठा समाज मंगळवेढा शहर व तालुक्यातील बांधव उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



अक्कलकोट : कुंभार यांचा सत्कार करताना अभय खोबरे.

### लिंगराज कुंभार यांच्या हस्ते शमी विघ्नेश गणेशाचे पुजन

**अक्कलकोट :** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी संकष्टी चतुर्थी निमित्त न्यासाच्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात लिंगराज कुंभार यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने लिंगराज कुंभार यांचा सहपरिवार सत्कार करण्यात आला. न्यासाचे पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, अप्पा हंचाटे, बाळासाहेब घाडगे, निखिल पाटील, प्रवीण घाटगे, पिट्टू साठे, राजू पवार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, विशाल घाटगे, विठ्ठल रेड्डी,चंदू हिबारे, अनिल गवळी, गुरुपादप्पा उडचण,प्रकाश पांढरे,सुरज सावंत आदी उपस्थित होते.

---




पंढरपूर : प्रियंका कराडे यांचा सन्मान करताना विश्वराज महाडिक, पवन महाडिक, सुनील चव्हाण आदी.

### टाकळी सिकंदरला शिवसेना जनसंपर्क कार्यालयाची सुरुवात

**पंढरपूर :** भीमा सहकारी साखर कारखाना टाकळी सिकंदर या भागामध्ये टाकळी पुळुज रोडवर युवतीसेना, शिवसेना जिल्हाप्रमुख इंजिनीयर प्रियंका परांडे यांच्या शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे यांच्याहस्ते झाले. चेअरमन विश्वराज महाडिक, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून करू असे प्रियंका परांडे यांनी सांगितले. यावेळी महेश साठे यांनी प्रियांका परांडे यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वराज महाडिक यांनी धनंजय महाडिक यांनी आपण प्रियंका परांडे यांच्या पाठीशी राहू अशी ग्वाही दिली. पवन महाडिक, जिल्हा नियोजन समिती सदस्य सुनील चव्हाण,भीमा कारखाना संचालक संतोष सावंत, शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख मुबिना मुलानी, रवीना राठोड, आरती बसवंती, महादेव भोसले, पल्लवी जन्मले, साळु कसबे, नकुशा चवरे, अंकुश कदम, दादासाहेब प्रक्षाळे, बाळासाहेब पाटील, कृष्णा वाघ, महेश कांबळे, रणजीत जगताप, समाधान गाडे, लियाकत मुलानी, गणेश चव्हाण, गणेश जाधव, भगवान प्रक्षाळे, भारत पाटील, प्रमोद बाबर, विश्वास वसेकर, प्रदीप परांडे, संतोष परांडे, कुमार परांडे, संकेत सोनटक्के आदी उपस्थित होते.

---

### ॲड.मुलाणी यूपीएससीमध्ये सातव्या क्रमांकाने उत्तीर्ण



**मोहोळ :** नुकताच केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) चा निकाल लागला. या निकालात देवडी (ता. मोहोळ) येथील ॲड. अशपाक शहाजान मुलाणी यांनी देशपातळीवर सातवा क्रमांक मिळविला. त्यांची मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेयर्स या विभागात असिस्टंट डायरेक्टर (एस एफ आय ओ) या पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या यशाबद्दल नातेवाईक आणि ग्रामस्थ यांच्याकडून गौरव करण्यात आला.

---



वेळापूर : ग्रामपंचायत कार्यालयातील कॅम्पमध्ये सहभागी झालेले ग्रामस्थ.

### वेळापूर ग्रामपंचायत येथे ६५ वर्षापुढील नागरिकांसाठी कॅम्प

**वेळापूर :** वेळापूरमध्ये उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नाना मंगुस्कर, ग्राम विकास अधिकारी कैलास सुरवसे, सर्व ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये ६५ वर्ष पुढील नागरीकांचा कॅम्प आयोजित केला होता. राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील जेष्ठ नागरिकांना सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा, यावर उपाययोजनासाठी आवश्यक साह्य साधने/ उपकरणे खरेदी करणे तसेच मन:स्वास्थ्य केंद्र, योगा उपचार केंद्र इत्यादी द्वारे त्यांची मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार शासन मान्यता देण्यात आली आहे. योजनेमध्ये ६५ वर्ष पुढील सर्व स्त्री पुरुष यांना तीन हजार रुपये अनुदान मिळणार आहे. या अनुषंगाने या योजनेचा कॅम्प आयोजित केला होता. यामध्ये एका दिवसामध्ये १४५ वयोवृद्ध लोकांनी या योजनेचा फॉर्म भरलेला आहे. यावेळी माजी ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ आडत, ग्रामपंचायत सदस्य दीपक राऊत, अमृत माने देशमुख, शिवाजी सावंत, तसेच बार्टीचे किरण वाघमारे, दयानंद बनसोडे सर्जेराव जाधव व गावातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# ‘स्वाभिमानी शेतकरी’कडून झोळ इच्छुक?

## करमाळा विधानसभा निवडणुकीची जुळवाजुळव जोमात



कुर्डुवाडी/प्रतिनिधी

राज्यातील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकींच्या हालचालींला वेग आला असून प्रत्येक इच्छुक उमेदवार आपापल्या पद्धतीने कामाला लागला आहे. करमाळा विधानसभा मतदारसंघासाठी करमाळ्याचे प्रा. रामदास झोळ स्वाभिमानी शेतकरी पक्षातून इच्छुक असून उमेदवारी मिळणार असल्याची चर्चा सुरू आहे. याबाबत शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी सोबत बैठका सुरू आहेत.

राज्यामध्ये निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर विविध घडामोडी घडत आहेत. यामध्ये प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडू, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, स्वराज्य संघटनेचे संभाजीराजे छत्रपती यांनी तिसरी आघाडी म्हणून परिवर्तन महाशक्ती आघाडीची घोषणा केली आहे. यामधून राजू शेट्टींच्या स्वाभिमानी शेतकरी संघटना पक्षाकडून रामदास झोळ इच्छुक आहेत, अशी वदंता सुरु झाली आहे. करमाळा विधानसभाचे विद्यमान आमदार संजय शिंदे यांनी विविध विकास कामाच्या शुभारंभाचा धडाका सुरू केला आहे. तर करमाळा मतदारसंघात अनेक इच्छुक आपल्या पद्धतीने कामाला लागले आहेत. करमाळ्याचे प्रा. रामदास झोळ यांनी गाव दौरे भेटीगाठीला सुरुवात केली आहे. नुकतेच त्यांनी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे सुरू असलेल्या उपोषण स्थळी भेट दिली आहे. तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा बैठका सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीसाठी प्रा. रामदास झोळ स्वाभिमानी पक्षाकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्याचे बोलले जात आहे.

**पाटील तुतारी उचलणार; बागलांची भुमिका अस्पष्ट**

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार नारायण पाटील यांनी यांना शरदचंद्र पवार यांच्या तुतारीचे चिन्ह मिळण्याची शक्यता आहे. कारण अकलूजचे मोहिते-पाटील यांची नारायण पाटील यांना साथ आहे. तर भाजपाच्या रश्मी बागल यांची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. यामुळे आगामी निवडणुकीच्या हालचालीला वेग आला असून प्रत्येकाने आपापल्या पद्धतीने फील्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे.

**झोळ यांची आज कुर्डुवाडीत पत्रकार परिषद**

प्रा. रामदास झोळ यांनी कुर्डुवाडी येथील विश्रामगृहामध्ये सोमवारी दि.२३ रोजी दुपारी ३ वाजता पत्रकार परिषद आयोजित केली आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. यावेळी उमेदवारी जाहीर होणार का? हे पत्रकार परिषदेमध्ये स्पष्ट होईल.

---

# जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत काळे प्रशाला विजयी

पंढरपूर/प्रतिनिधी



पंढरपूर : सोलापूर जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या संघाचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष कल्याणराव काळे व इतर मान्यवर.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या वतीने शासकीय मैदान नेहरूनगर येथे झालेल्या सोलापूर जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या गटात वसंतराव काळे प्रशाला वाडीकुरोलीच्या संघाने अजिंक्यपद प्राप्त केले.

संघाची पुणे विभागीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली असून विभागीय खो-खो स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. वसंतराव काळे प्रशालेच्या संघाने पंढरपूर तालुक्याचे प्रतिनिधित्व करताना पहिल्या सामन्यात उत्तर सोलापूर, वडाळा या संघाचा एक डाव सतरा गुणांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात बालाजीनगर (ता.मंगळवेढा) संघाचा एक डाव पंधरा गुणांनी पराभव केला. सेमी फायनलच्या सामन्यात शिवणे (ता.सांगोला) संघाचा एक डाव बरा गुणांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात पावसामुळे अनगर (ता. मोहोळ) संघाने वसंतराव काळे प्रशालेच्या संघास पुढे चाल दिल्याने वसंतराव काळे प्रशालेने सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला.

संघाची कर्णधार साक्षी देठे, अष्टपैलू खेळाडू स्नेहा लामकाने, कल्याणी लामकाने, ऋतुजा पासले, श्रावणी कस्तुरे, श्रुती कस्तुरे, समृद्धी जगताप, समृद्धी सुरवसे, अमृता सुरवसे, श्रावणी देठे, ऋतुजा यलमार, सानिका चव्हाण, आयेशा शेख, वैष्णवी काळे, पल्लवी बोराडे या खेळाडूंनी अष्टपैलू खेळ केला. खेळाडूंना अतुल जाधव, समाधान काळे यांचे मार्गदर्शन लाभले.

खेळाडू व प्रशिक्षकांचा सत्कार श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कल्याणराव काळे यांच्या हस्ते झाला. यावेळी सचिव बाळासाहेब काळे, महादेव देठे, यशवंत पतसंस्थेचे चेअरमन शहाजी साळुंखे, नारायण शिंदे, प्राचार्य संजय कुलकर्णी, पालक अनिल लामकाने, नौशाद मुजावर उपस्थित होते. सर्व खेळाडू व प्रशिक्षकांना पुढील विभागीय स्पर्धेसाठी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, सुप्रिया गाढवे, सोलापूर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, सचिव अजित संगवे, प्राचार्य संजय कुलकर्णी, पर्यवेक्षक शब्बीर शेख पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

---

# वयोवृद्ध नागरिकांसाठी कायद्यात अनेक तरतुदी : न्या. पोतदार

## सांगोल्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदेशीर मार्गदर्शन शिबिर

सांगोला/प्रतिनिधी

वयोवृद्ध नागरिकांसाठी कायद्यामध्ये अनेक तरतुदी आहेत. कायद्याचा आधार घेऊन आपले अधिकार प्राप्त करावेत असे आवाहन सांगोला न्यायालयाच्या प्रथम दिवाणी न्यायमूर्ती आदरणीय बी.एम. पोतदार यांनी केले.

तालुका विधी सेवा समिती व विधीज्ञ संघ सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदेशीर मार्गदर्शन शिबिर शनिवारी (दि. २१) लोकसेवा बहुउद्देशीय संस्था कडलास संचलित, मातोश्री वृद्धाश्रम येथे पार पडले. यावेळी त्या बोलत होत्या. शिबिरासाठी अध्यक्ष म्हणून बी.एम. पोतदार, सह दिवाणी न्यायमूर्ती एस. एस. साळुंखे उपस्थित होते. एस. एस. साळुंखे यांनी ज्येष्ठ नागरिकांना कायद्याचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी सामाजिक संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न करावा असे आवाहन केले. शिबिरामध्ये रामचंद्र गाडेकर यांनी मातोश्री वृद्धाश्रमात कोणताही फंड अनुदान नसताना, येथे आलेल्या प्रत्येक वयोवृद्ध नागरिकांची काळजी घेतली जाते, असे सांगितले. शिबिरासाठी मातोश्री वृद्धाश्रमाचे संस्थापक राहुल जाधव, सुवर्णा जाधव, अशोक जाधव, यांच्यासह न्यायालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल बिराजदार यांनी तर सूत्रसंचालन पत्रकार सचिन भुसे यांनी केले.

---

# अक्कलकोटमध्ये आज स्त्री आरोग्य, वंध्यत्व तपासणी शिबीर

अक्कलकोट/प्रतिनिधी

ॲपोलो फर्टीलीटी, सोलापूर व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था, यांच्या संयुक्त विद्यमाने नि:शुल्क वंधत्व निवारण , स्त्री आरोग्य आणि वंध्यत्व या विषयावर व्याख्यान व तपासणीचे आयोजन सोमवारी (दि.२३) सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत न्यासाच्या यात्री निवासातील हॉलमध्ये करण्यात आल्याची माहिती जेष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर यांनी दिली.

हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलका भोसले यांच्या अध्यक्षतेखाली व उपाध्यक्षा रत्नमाला मचाले आणि सचिवा अर्पिताराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. शिबिरात नोंदणी केलेल्यांना मोफत स्कॅन धातू तपासणी करण्यात येणार आहे. शिबिरात लग्नानंतर अनेक वर्षांनीही गर्भधारणा झालेली नसेल, अनियमित मासिक पाळी, जास्त रक्तस्त्राव आदी समस्यांचे निवारण केले जाईल, असे ॲपोलो सेंटर सोलापूरचे व्यवस्थापक डॉ. किर्ती बालाजी कटारे यांनी सांगितले. नोंदणीसाठी मो : ९१५४८२५६५२, ८८३०७६२००६ यावर संपर्क साधावे.

**अलकाताई व अर्पिताराजे भोसलेंचे भरीव योगदान**

अखिल भारतामध्ये धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांची सहयोगी संस्था म्हणून हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेची स्थापना ही लता मंगेशकर यांच्या प्रेरणेने व आधारस्तंभ जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि विशेष सहकार्य न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलकाताई भोसले, सचिवा अर्पिताराजे भोसले यांचे महिला सबलीकरण व सक्षमीकरणात भरीव योगदान आहे.

---

# स्वेरी फार्मसीमध्ये दोन दिवसीय इंडस्ट्री एक्स्पर्ट लेक्चर सिरीज

पंढरपूर/प्रतिनिधी

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित, कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये दि.८ व ९ सप्टेंबर या दोन दिवसात फार्मसी क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित केले होते.

सत्रात प्रमुख अतिथी म्हणून ‘क्वा ड्राय फार्मा प्रायव्हेट लिमिटेड.’ (जि.ठाणे) या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीकांत सदाफुले हे उपस्थित होते. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली या मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते. सत्राला प्रमुख अतिथी म्हणून क्वा ड्राय फार्मा प्रा.लि. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीकांत सदाफुले हे होते. दीपप्रज्वलनानंतर प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ.मणियार यांनी प्रास्तविकात ‘टॅबलेट कोटिंग’ म्हणून ओळखली जाणारी महत्वाची प्रक्रिया सध्या ‘फार्मा इंडस्ट्री’मध्ये महत्वाची असून ती अनिवार्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे उत्तम करिअरचा पर्याय म्हणून पहावे, असे सांगितले. सदाफुले यांनी ‘फार्मा इंडस्ट्री’ बद्दल अद्ययावत माहिती दिली. तसेच ‘टॅबलेट कोटिंग’ बद्दल सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांनाही समाधानकारक उत्तरे लाभली. सूत्रसंचालन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रदीप जाधव यांनी तर डिप्लोमा फार्मसी विभागाचे प्रमुख डॉ. जितेंद्र कंदले यांनी आभार मानले.

---

# जनतेचा आशीर्वाद हेच माझे ऊर्जा स्त्रोत

## आमदार शहाजीबापू पाटील; खवासपूर ग्रामस्थांकडून नागरी सत्कार

सांगोला/प्रतिनिधी



सांगोला : खवासपूर गावात सत्कारप्रसंगी संबोधिन करताना आ. शहाजीबापू पाटील. समोर उपस्थित जनसमुदाय.

३५ वर्षाच्या प्रदीर्घ राजकीय संघर्षात तालुक्यातील जनतेने मला साथ दिली. माझ्या संपूर्ण आयुष्यात याची उतराई होऊ शकत नाही इतके माझ्यावर जनतेचे उपकार आहेत. जनतेचा आशीर्वाद हाच माझा ऊर्जा स्त्रोत आहे असे प्रतिपादन आमदार शहाजीबापू पाटील यांनी केले.

सांगोला तालुक्यातील खवासपूर गावासाठी ३१ कोटी ८५ लाख रुपयाचा निधी दिल्याबद्दल तसेच स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेसाठी ८८३ कोटी रुपये मंजूर केल्याबद्दल तसेच माण नदीवरील सर्व बंधारे वर्षातून तीन वेळा भरून देण्याची तरतूद केल्याबद्दल खवासपूर ग्रामस्थांच्या वतीने आमदार शहाजीबापू पाटील यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

जनतेच्या पाठिंबावरच विकास कामांसाठी पाच हजार कोटी रुपयांचा निधी आणू शकलो. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा तालुक्यातील ८० हजार महिलांना लाभ झाला आहे. तालुक्यातील एक लाख महिलांना या योजनेच्या लाभ मिळवून देण्याचे माझे उद्दिष्ट आहे. ३५ वर्षात माझ्या ऑफिसला आलेला एक व्यक्ती आतापर्यंत रिकाम्या हाताने परत गेली नाही, असेही आ.पाटील म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर माजी जि.प. सदस्य गोविंद जरे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य रफिक नदाफ, महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख राणी माने, ओबीसी आघाडीचे जिल्हाप्रमुख शिवाजी घेरडे, शिवसेना नेते दिग्विजय पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, युवासेना तालुकाप्रमुख गुंडादादा खटकाळे, दीपक ऐवळे, प्रितेश दिघे, अजिंक्य शिंदे, लक्ष्मण भोसले, केशर भोसले, बाळासाहेब भोसले, शाम बागल, सतीश पाटील, राजू गायकवाड, विकी भोसले, सौदागर सावंत, विनोद ऐवळे, आबा ऐवळे, पैलवान धनाजी बोडरे, मुरलीधर जरे, सुरेश जरे ल, दुर्योधन जरे, जयवंत भोसले, मनीषा भोसले, रोहिणी बागल, हेमा बोडरे, रूपाली गायकवाड, कल्पना जरे आदी उपस्थित होते. यावेळी खवासपूर गावात शिवसेना, युवासेना, शिवसेना मागासवर्गीय आघाडी, शिवसेना महिला आघाडीच्या शाखांचे उद्घाटन करण्यात आले.

**भर पावसात आमदार शहाजीबापूंचा सत्कार**

यावेळी खवासपूर गावातील आजी-माजी सैनिक, पोलीस अधिकारी, डॉक्टर, वकील, अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शिक्षक व इंजिनियर यांचा एकत्रित सत्कार करण्यात आला. भर पावसात आ.शहाजीबापूंच्या सत्कारासाठी ग्रामस्थांनी हजेरी लावली होती.

---

# मोहिते महाविद्यालयात हिंदी सप्ताह साजरा

अकलूज/प्रतिनिधी

शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज येथे हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवसानिमित्त हिंदी सप्ताह साजरा झाला. कार्यक्रमांचे प्रमुख पाहुणे श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील बावडा, महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. तायाजी लोंढे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. शिवप्रसाद टिळेकर होते.

कार्यक्रमाची सुरुवात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रभारी प्राचार्य शिवप्रसाद टिळेकर यांनी हिंदी माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अतिशय महत्त्वाची भाषा बनत असल्याचे सांगितले. हिंदी सप्ताहात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यांचे बक्षिस वितरण करण्यात आले.

**स्पर्धांचा निकाल** – १) काव्य वाचन-प्रथम क्रमांक- गौरी लोंढे, द्वितीय क्रमांक- सना शेख, तृतीय क्रमांक- गायत्री पाटील उत्तेजनार्थ - अकलेश गेजगे, प्रतीक्षा मस्के २) सामान्यज्ञान प्रश्न मंजूषा- प्रथम क्रमांक (विभागून)- राज शिंदे, श्रावणी ढगे, व्दितीय क्रमांक (विभागून)- मोहिने तुपे, आरती साठे, तृतीय क्रमांक- जान्हवी मान ३) निंबध लेखन- प्रथम क्रमांक- गौरी गौड, व्दितीय क्रमांक- गौरी लोंढे, तृतीय क्रमांक- हितेष पुंज, उत्तेजनार्थ - राजनंदिनी बोडरे, ज्योति भगत यांनी यश मिळवले. यावेळी एम. ए. हिंदी विषयात सोलापूर विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळणाऱ्या सविता गायकवाड, गिरीजा गायकवाड यांचा सन्मान करण्यात आला.

परीक्षक म्हणून प्रा. विनायक सूर्यवंशी, डॉ. विजयकुमार शिंदे, डॉ. निवृत्ती लोखंडे, विजयकुमार शिंदे डॉ. विजयकुमार शिंदे व प्रा. सोमनाथ चव्हाण यांनी काम पाहिले. प्रास्ताविक राज शिंदे, प्रमुख पाहुण्याचा परिचय- रोहिणी चव्हाण तसेच तमन्ना तिकोटे, ऋतुजा शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन गौरी लोंढे हिने केल. आभार साक्षी भाकरे हिने केले. प्रा.दादासाहेब कोकाटे, डॉ.आण्णासाहेब नलवडे, प्रा.रणजीत लवटे उपस्थित होते. डॉ.विजयकुमार शिंदे प्रा. सोमनाथ चव्हाण, डॉ.निवृत्ती लोखंडे आदींनी परिश्रम घेतले.




# वैराग भागात डिसले-कापसे वाद उफाळला

## दोघांनी बदलले नेते | डिसले सोपल गटात तर कापसे राऊतांसोबत

✔ बार्शी/सचिन अपसिंगकर

बार्शी विधानसभा मतदारसंघांमध्ये वैराग भागातील ५७ गावे समाविष्ट झाल्यानंतर या भागातील नेत्यांना अर्थातच विधानसभा निवडणूक, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. या भागात पूर्वापार माजी आमदार चंद्रकांत निंबाळकर आणि धन्यकुमार भूमकर यांचे गट होते. त्यानंतर गेल्या वीस वर्षात या भागात संतोष निंबाळकर ,मकरंद निंबाळकर, निरंजन भूमकर, अनिल डिसले, बाळासाहेब कोरके, अरुण कापसे यांचे गट उदयास आले. या सर्व नेत्यांनी कधी माजी मंत्री दिलीप सोपल तर कधी आमदार राजेंद्र राऊत यांच्या गटाला साथ दिली. त्यापैकी ग्राहक फेडरेशनचे माजी अध्यक्ष अरुण कापसे, आणि पंचायत समितीचे माजी सभापती अनिल डिसले यांच्यातील शीतयुद्धाचे रूपांतर आता वैयक्तिक हाडवैरापर्यंत येऊन पोहोचले आहे.





अरुण कापसे

वैराग भागात २५ वर्षांपूर्वी संतोष निंबाळकर यांचा पराभव करून अनिल डिसले यांनी जोरदार राजकीय प्रवेश केला. अनिल डिसले यांचे ज्येष्ठ बंधू स्वर्गीय शिवाजीराव डिसले यांचे उद्योगांच्या निमित्ताने जिल्ह्याचे नेते विजयसिंह मोहिते पाटील यांच्याबरोबर घनिष्ठ संबंध होते. त्यानंतर अनिल डिसले हे बार्शी विधानसभा मतदारसंघात आमदार राजेंद्र राऊत यांच्याबरोबर कट्टरनिकतवर्तीय सहकारी म्हणून कार्यरत राहिले. वारकरी सांप्रदायाची पार्श्वभूमी लाभलेल्या अनिल डिसले यांच्या विनम्र शांत व मनमिळाऊ कार्यपद्धतीमुळे त्यांचे या भागात वर्चस्व वाढत राहिले. गेली पाच वेळेस त्यांच्या ताब्यात जवळगाव ग्रामपंचायत ज्योतिबाची वाडी ग्रामपंचायत ताब्यात राहिली आहे. त्याचप्रमाणे अनिल डिसले यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य म्हणून तीन वेळेस काम पाहिले आहे. डिसले यांना आमदार राऊत यांनी पंचायत समितीचे सभापती पदही भूषविण्याची संधी दिली. मात्र राऊत यांचे वैराग भागातील उजवे हात समजले जाणाऱ्या अनिल डिसले यांच्याबरोबर विसंवाद आणि विद्वेष आले. त्यानंतर डिसले राऊतांपासून दुरावतच गेले. डिसले यांनी आज पर्यंत कधीही कोणत्याही जाहीर राजकीय व्यासपीठावरून राऊत यांच्या विरोधात ब्र शब्दही काढलेला नाही. मात्र लोकसभा निवडणुकीत डिसले यांनी महाविकास आघाडीचे काम केले असे मानले जाते. त्यानंतर दिसले हे माजी मंत्री सोपल यांच्याबरोबर वेगवेगळ्या कार्यक्रमात जाहीरपणे वावरू लागले आहेत. त्यामुळे डिसले हे सोपल यांच्या राजकीय गट बांधणीत सक्रिय झाल्याचे लक्षात येत आहे. त्यामुळे डिसले हे आमदार राऊत यांची २५ वर्षांची साथ सोडून सोपल गटात कार्यरत झाल्याचे जाणवते आहे.

### ग्रामीण नेत्यांची साठमारी कोणते वळण घेणार?

नुकतेच डिसले व कापसे यांच्यामध्ये सोलापूर सदर बाजार पोलीस स्टेशनमध्ये परस्पर विरोधी गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे डिसले कापसे यांच्यामधील परंपरागत वैमनस्य उफाळून आले आहे. त्यामुळे आगामी काळात या दोन ग्रामीण नेत्यांची साठमारी कोणते वळण घेते याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.





अनिल डिसले

दुसरीकडे जवळपास ३० वर्षाहून अधिक काळ माजी मंत्री दिलीप सोपल यांच्यासोबत सावलीप्रमाणे फिरणारे त्यांचे अत्यंत घनिष्ठ मित्र अरुण कापसे हे आमदार राऊत गटात पूर्णपणे उघड सक्रिय झाल्याचे जाणवत आहे. अरुण कापसे यांनी सोपल यांच्या आशीर्वादामुळे आजपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मार्केटिंग फेडरेशन व ग्राहक फेडरेशनचे पदाधिकारी म्हणून पदे भूषविलेली आहेत. सोपल यांच्याप्रमाणेच मार्मिक भाषणांसाठी प्रसिद्ध असलेले अरुण कापसे हे वैराग भागात कधीच मास लीडर म्हणून प्रसिद्ध नव्हते त्यांना डिसले यांच्या विरोधात ग्रामपंचायत निवडणूक जिंकता आली नाही. पण सहकाराच्या राजकारणात मुरब्बे असलेल्या अरुण कापसे यांनी सोसायट्यांच्या माध्यमातून वैराग भागात कार्यकर्ते जोडण्याची काम केले. त्यामुळे सोपल यांच्याजवळ वजन असणारा सहकारी अशी कापसे यांची वैराग भागात प्रतिमा आहे. सध्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुका दृष्टीपथामध्ये आहेत. नुकतेच सोसायटींच्या निवडणुका झाल्या आहेत. सहकारी बाजार समितीची निवडणूक ही अगदी डोळ्यासमोर आहे अशा परिस्थितीमध्ये कापसे यांचा सहकार क्षेत्रातला पूर्व अनुभव राऊत यांच्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

## संक्षिप्त वृत्त



सोलापूर: उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देताना आनंद चंदनशिवे.

### रोजंदारी अन् बदली कामगारांना सेवेत कायम करा : चंदनशिवे


✔ **सोलापूर** : सोलापूर महानगरपालिकामधील सन १९९५ नंतर सेवेत कार्यरत असलेल्या २४९ रोजंदारी व बदली कामगारांना सेवेत कायम करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांनी केली. या सेवकांना सेवेत कायम करण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने ३१ मे २०२२ रोजी प्रस्ताव नगर विकास विभागाकडे पाठवलेला आहे या प्रस्तावावर आज पर्यंत कसलाही विचार झालेला नाही.त्यामुळे कामगारावर एक प्रकारे फार मोठा अन्याय झालेला आहे. तरी या प्रस्तावास मान्यता देणेबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत, अशी विनंती चंदनशिवे यांनी केली आहे. यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, इरफान शेख, वर्षाराणी शिंदे, शशिकला कसफटे आदी उपस्थित होते.



सोलापूर : स्केटिंग स्पर्धेत सहभागी मुलांसह भारत जाधव, प्रशांत बाबर व इतर.

### रोप सांस्कृतिक महोत्सव; स्केटिंग स्पर्धेला प्रतिसाद

✔ **सोलापूर** : आमदार रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जुळे सोलापूर येथे रोप फाँऊडेशन आयोजित रोप सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत गोविंदश्री मंगल कार्यालय येथे स्केटिंग स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. याला बाळगोपाळांचा प्रतिसाद मिळाला. स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष भारत जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी आयोजक प्रशांत बाबर यांनी पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी मुसा अत्तार, ऋषीकेश शिंदे,रियाज निगेहबान, सचिन चलवदे, युनूस अत्तार,झीशान शेख, क्रिडा शिक्षक युसूफ पिरझादे, प्रताप यादव, रवि ओहोळ पंढरपुर, सागर राठोड, संतोष धुत बार्शी, वासुदेव करमकोंडा, यांची प्रमुख उपस्थिती होती. स्केटिंग स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील बार्शी पंढरपूर सांगोला मंगळवेढा या भागातून स्केटिंग पटवून मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.



सोलापूर: व्याख्याना दरम्यान नाट्यशाळेच्या कलाकारांनी 'अफजल खान वध' हा प्रसंग सादर केला.

### प्रतापगडाचा रणसंग्राम अद्वितीय पराक्रम : स्वामी गोविंददेव

✔ **सोलापूर** : छत्रपती शिवरायांनी क्रूरकर्मा अफजल खानाला त्याच्या कृत्यांची शिक्षा देऊन संपवले. प्रतापगडाचा रणसंग्राम हा जगातील लढायांपैकी अद्वितीय पराक्रम आहे, असे प्रतिपादन छत्रपती श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र अयोध्याचे कोषाध्यक्ष प. पू. स्वामी गोविंददेव गिरिजी यांनी केले. ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त समस्त हिंदू समाजातर्फे जुनी मिल कंपाउंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये २५ सप्टेंबरपर्यंत आयोजित छत्रपती शिवाजी महाराज कथेच्या तिसऱ्या दिवशी शनिवारी स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी मार्गदर्शन केले. 'शिवप्रताप' या विषयावर बोलताना त्यांनी कान्होजी जेधे, प्रतापगड युद्धनीती, जावळीचा वेढा आणि अफझलखान वध आदींवर विवेचन केले. याप्रसंगी सिनेकलावंत आमीर तडवळकर यांच्या समर्पित नाट्यशाळेच्या कलाकारांनी 'अफजल खान वध' हा चित्तथरारक प्रसंग नाट्यरूपातून उत्तमरित्या सादर केला. यावेळी उपस्थितांनी बालकलाकारांचे कौतूक केले.

### मधला मारुती परिसरात मारहाण

✔ **सोलापूर** : जागेच्या वादातून लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत दोन महिलासह तिघेजण जखमी झाले. ही घटना मधला मारुती चौक परिसरात शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. किरण प्रकाश कांबळे (वय २४), भारती प्रकाश कांबळे (वय ३४) आणि वंदना दिलीप कांबळे (वय ३२ सर्व रा.मधला मारुती चौक सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.



## नवरात्रोत्सव तयारीची लगबग सुरू

**सोलापूर : गणरायाला निरोप दिल्यानंतर शहरवासीयांना आता नवरात्राचे वेध लागले आहेत. सोलापूरकरांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रूपाभवानी मंदिरातही जय्यत तयारी सुरू आहे. मंदिर परिसर, गोपूर, शिखर व छबिना साहित्यांना रंगरंगोटी करण्यात येत असून आवश्यक त्या ठिकाणी डागडुजीचे काम सुरू आहे.**

## गोदूताई वसाहतीसाठी १०० कोटींचा निधी आणणार : आडम

✔ **सोलापूर** : कॉ.गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेची रौप्य महोत्सवी वर्ष वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यामध्ये माजी आ. आडम मास्तर यांनी गोदूताई वसाहतीसाठी १०० कोटींचा निधी आणणार असल्याची प्रतिज्ञा केली.



ते बोलताना पुढे म्हणाले की, आज विडी उद्योगावर संकट आले आहे. यामध्ये पश्चिम बंगाल मधून येणाऱ्या बनावट विड्याचा सुळसुळाट झालेला आहे.तसेच महाराष्ट्र राज्यात या बनावट विडी उत्पादनांचा शिरकाव झाला असून नियमित पणे कर भरणाऱ्या उद्योजकांना याचा थेट फटका बसत आहे. अधिकृत कारखानदारकडून मिळणारे लाभ मिळत मोदी सरकार सत्तारूढ झाल्यापासून बंद झाले आहेत, अशी टीका आडम मास्तर यांनी केली.

प्रास्ताविक युसुफ शेख यांनी केले व्यासपीठावर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव ड.एम. एच.शेख,संस्थेचे चेअरमन फातिमा बेग, शकुंतला पाणीभाते,नसीमा शेख, विल्यम ससाणे, निलोफर शेख, अरिफा शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन संस्थेचे मुख्य व्यवस्थापक कॉ. विल्यम ससाणे यांनी केले.

## किरकोळ कारणावरून लाकडाने मारहाण

✔ सोलापूर/प्रतिनिधी

कपडे धुताना पाणी उडल्याच्या किरकोळ कारणावरून तिघांनी मिळून एकास मारहाण केली. याप्रकरणी जेलरोडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २० रोजी घडली.

महेश मल्लिकार्जुन अगनूर (वय ५४, रा. साखर पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. महेश व त्याची पत्नी हे घरात असताना त्यांच्या घरासमोर राणाऱ्या महेसीन परेमपल्ली या त्यांच्या दरवाजासमोर कपडे धूत होत्या. त्याचे पाणी अगनूर यांच्या घरात उडत होते. महेश यांनी तहेसीन यांना धुणे दुसरीकडे धुवा पाणी घरात उडत आहे, असे सांगितले. तहेसीन रफीक परेमपल्ली, मुबीन रफीक परेमपल्ली व मुज्जूरफीक परेमपल्ली तिघे (रा. विणकर बागेसमोर, साखर पेठ) या तिघांनी महेश यांना शिवीगाळ करत मारहाण केली.

**गवळीवस्ती येथे आत्महत्येचा प्रयत्न**

दमाणीनगर परिसरातील गवळी वस्तीत राहणाऱ्या अक्षय शिवराम नवले (वय २०) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.

शुक्रवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास त्याने घरातील छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून वडिलांनी शासकीय रुग्णालयात अर्धवट बेशुद्ध अवस्थेत दाखल केले. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## भगवंतांची भक्ती केल्यास माणसाचे रक्षण होते

### डॉ. नरसिंहाराव : सोलापुरात तेलुगू भाषेत प्रवचन

✔ सोलापूर/प्रतिनिधी

मनुष्याचे जीवन सुखकर होण्यासाठी भगवंतांची भक्ती करणे गरजेचे आहे. भगवंतांची भक्ती केल्यासच माणसाचे रक्षण होते, असे प्रतिपादन प्रख्यात तेलुगू प्रवचनकार ब्रह्मश्री सहस्रावधानी पद्मश्री डॉ. गरिकिपाटी नरसिंहाराव यांनी शनिवारी सोलापुरात केले.



फेडरेशन ऑफ तेलुगू असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र (एफटॅम) अंतर्गत गठीत सोलापूर समितीतर्फे सोलापुरात आयोजित अध्यात्मिक तेलुगू प्रवचनात ते बोलत होते. अक्कलकोट रोड एमआयडीसीतील पद्मावती कन्व्हेंशन्समध्ये त्यांची अमृतवाणी बरसली. आपल्या अमृतवाणीतून त्यांनी महाकवी कालिदास यांचे श्लोक उलगडत धर्म, संस्कृती आणि जीवनशैलीवर प्रबोधन केले. ते म्हणाले की, आधुनिक जीवनशैलीमुळे कुटुंब व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होत आहे. सर्वांनी मिळून मिसळून राहणे नितांत गरजेचे आहे. मिळून मिसळून राहण्याची पद्धती व नातेसंबंधाचे महत्व जगात केवळ भारतातच आहे. मिळून मिसळून राहण्यातच खरे सुख आहे. हे लक्षात येता एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होऊ नये, याची काळजी प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे. यावेळी 'एफटॅम' सेंट्रल टीमचे जगनबाबू गंजी, पेंटप्पा गड्डम, मुरलीधर अरकाल, श्रीधर म्याकल, भूपती कमटम, विजयकुमार उडता, कमिटी सदस्य गंगाधर देवसानी, सत्यनारायण अडगटला आदी उपस्थित होते.

## दहा टक्के पद्भरतीसह रिक्त अन् अपात्र जागा तातडीने भरा

### ▶▶ शिक्षण विभागाने जारी केला आदेश

✔ सोलापूर/प्रतिनिधी

दहा टक्के पदभरतीसह रिक्त व अपात्र जागा तातडीने भरा अशा प्रकारचा आदेश राज्याच्या शिक्षण विभागाने नुकताच जारी केला असून ही पद भरती राज्यातील दुसऱ्या टप्प्यातील होत असल्याचे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

या संदर्भात लवकरच शिक्षक पदभरती बाबत एकूण १०० टक्के पदांपैकी ८० टक्के पदभरतीस शासनाच्या वित्त विभागाने मान्यता दिलेली असताना पहिल्या टप्यात जिल्हा परिषद व महानगरपालिक, नगरपालिकेकडून पूर्ण क्षमतेने सर्व रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. त्याच बरोबर पहिल्या टप्प्यातील जाहीर झालेल्या दोन्ही निवड याद्यांमधून हजारो पदे रिक्त, अपात्र, गैरहजर या प्रकारातील आहेत. रिक्त असणारी जास्तीत जास्त शिक्षकांची पदे आपण पवित्र पोर्टलमार्फत सुरु झालेल्या शिक्षक भरती टप्पा-२ मध्ये भरतीसाठी द्यावीत, संबंधित विषयाबाबत खालील मागण्यांचा सकारात्मक विचार करावी अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे. पवित्र पोर्टलवर शिक्षक भरतीची जाहीर झालेली पहिली यादी २५ फेब्रुवारी, २०२४ व दुसरी यादी



दिनांक २५ जून २०२४ या दोन्ही याद्यांमधून निवडीसाठी शिफारस झालेले अनेक उमेदवार कागदपत्र पडताळणीतून बाहेर पडले आहेत. शेकडोच्या संख्येने उमेदवार गैरहजर राहिलेले आहेत. काही उमेदवार निवड होऊन, नियुक्तीपत्र घेऊन देखील प्रत्यक्ष शाळेवर गैरहजर राहिलेले आहेत अशा सर्व जागांची शहानिशा करून त्या जागांची निश्चिती करावी व पुढील जाहिरात प्रक्रियेत त्या जागांचा समावेश करण्यात यावा, ८० टक्के प पोर्टलवर जाहिरात प्रक्रिया राबवत असताना अनेक महानगरपालिका, नगरपालिका आस्थापनांनी ८० टक्के पदभरतीसाठी जाहिरात काढताना काही प्रमाणात जागा मागे ठेवल्या होत्या किंबहुना पूर्ण क्षमतेने जाहिराती काही कारणास्तव दिल्या नव्हत्या. अशा जिल्हा परिषद महानगरपालिका, गरपालिका आस्थापनांनी आपल्याकडील उर्वरित रिक्त पदांच्या जाहिराती पुढील भरती प्रक्रियेसाठी द्याव्यात, अशी मागणी होत आहे.

## गुडलक मोबाईल शॉपी फोडली

✔ **सोलापूर** : लष्कर येथे गुडलक मोबाईल शॉपी फोडून चोरट्याने ७० हजाराचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी मोहसिन नासीर पठाण (वय ३७ रा. अमन चौक, नई जिंदगी) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे पठाण यांची लष्कर येथे गुडलक मोबाईल शॉपी आहे. चोरट्याने शॉपीच्या मागील बाजूचा पत्र्याचा दरवाजा उचकटून दुकानात प्रवेश केला.

दुकानात लाईट बील भरण्यासाठी ठेवलेली रोकड व दुरूस्तीसाठी आलेले ५७ मोबाइल, चार्जर व केबलचे १० बॉक्स असा ७० हजाराचा ऐवज चोरून नेला. तपास हवालदार फुटाणे हे करित आहेत.

**घोडातांडा येथे घरफोडी**

कुमठा येथील घोडातांडा येथे राहणाऱ्या सुनिता पवार यांचे बंद घर फोडुन चोरट्याने रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा ९५ हजारांचा ऐवज चोरून नेला. त्यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.